# २ राजनीती

(अ) शेरशहाची प्रशासन व्यवस्था, मनसब व जहागीर

(ब) अकबराचे धार्मिक धोरण,
औरंगजेबांचे धार्मिक संघटनांशी संबंध

## (अ) मुघलकालीन प्रशासन व्यवस्था

मुघल सत्तेची स्थापना बाबराने केली. तर त्यास साम्राज्याचे स्वरूप देण्याचा प्रयत्न अकबराने केला. भिन्न वंश, भिन्न धर्म असतानाही दुसऱ्या देशामध्ये राज्य करण्याचा अधिकार प्राप्त करता येतो. हा विचार अकबराने प्रत्यक्षात आणला. आपली अद्ययावत प्रशासकीय यंत्रणा उभी केली. उदार धोरणाचा अवलंब करून आपली सत्ताही त्याने भक्कम पायावर उभी केली.

१५ ऑक्टोबर, १५४२ मध्ये अमरकोट येथे जन्मलेल्या अकबरास हुमायूनच्या अपघाती मृत्यूमुळे वयाच्या १३ व्या वर्षी १४ फेब्रुवारी, १५५६ मध्ये राज्याभिषेक केला गेला. बैरामखान याच्या मार्गदर्शनाखाली अकबराची यशस्वी वाटचाल सुरू झाली. दिल्लीची इस्लामी राजवट खंडित करून हेमूने (हिंदू) आपली सत्ता निर्माण केली. त्याचा अकबराने इ.स. १६५६ मध्ये पानिपतच्या दुसऱ्या युद्धात पराभव केला व दिल्लीवर आपले वर्चस्व निर्माण केले. यानंतर अकबराने माळवा, चुनार, गोंडवन, राजस्थान, जयपूर, मेरठ, मेवाड, गुजरात, बिहार, बंगाल, ओरिसा, काबूल, काश्मीर, सिंध इत्यादी प्रांत ताब्यात घेतले तर दक्षिणेकडे अहमदनगर, खानदेशवर आपले वर्चस्व निर्माण केले. अकबराचे साम्राज्य बंगालपासून काबूल-कंदहारपर्यंत तर हिमालयापासून दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत विस्तारले होते. अकबराचे साम्राज्यविस्ताराचे धोरण जहांगिर, शहाजहान व औरंगजेब यांनी पुढे चालविले. तर अकबराने निर्माण केलेली प्रशासन व्यवस्था मुघल कालखंडाच्या अखेरीपर्यंत टिकून राहिली.

### मुघल राजपद

मुघल काळात सत्ता ही राजाच्या हाती केंद्रित झालेली होती आणि त्या दृष्टिकोणातून त्यांचे सिद्धांत अस्तित्वात आले होते. बाबराच्या राजपदाचा विचार करता तैमुर (तुर्क) आणि चंगीज (मोंगोल) या मातृ-पितृ घराण्यांच्या विचारांचा जो प्रभाव होता त्यामध्ये तैमुरवर धर्माचा

Scanned with CamScanner

विचार आकारास आला होता. बाबर ते औरंगजेबापर्यंत राजपद उत्क्रांतीतील टप्पे पुढीलप्रमाणे पाहावयास मिळतात.

१. बाबर : स्वकेंद्रित सत्तेचा सिद्धांत

२. हुमायून : ईश्वरी स्फूर्तीचा सिद्धांत

३. अकबर : ईश्वरदत्त राजसत्तेचा सिद्धांत

४. शहाजहान : ईश्वरदत्त राजसत्तेवर हिंदू विश्वासाचा प्रभाव

५. औरंगजेब : धर्मांध विचारांचा राजसत्तेवर प्रभाव.

बाबराचा वंशपरंपरागत राजसत्तेवर विश्वास होता. त्याने आपली 'पादशाही' निर्माण केली. 'पाद' म्हणजे स्थैर्य व मालकी तर शहा म्हणजे स्वामी. राजसत्तेवर घराण्याचा मालकी हक्क त्याने स्थापन केला आणि 'बादशहा' हा किताब घेऊन बाबराने आपले श्रेष्ठत्व दाखवून दिले.

हुमायून ईश्वरी अंशावर आपला हक्क सांगत होता. हुमायूनला दिल्लीवरील आपली सत्ता गमवावी लागली अशा विपन्नावस्थेतही आपणास दैवी स्फूर्ती मिळाल्याचे हुमायून सांगतो. सूर्य हा विश्वाचा ज्याप्रमाणे केंद्रबिंदू आहे त्याप्रमाणे मानवी जगाचा आपण केंद्रबिंदू आहोत असे हुमायून मानतो. 'कानून-ए-हुमायुनी' या ग्रंथाचा लेखक ख्वांदमीर हुमायूनला 'परमेश्वराची सावली' असे संबोधतो. राजमुकूट व राजपोशाख याबाबत ख्वादमीरने वर्णन केले आहे की, 'रविवारी राजा बादशहा झगमगाटाचा, पिवळ्या रंगाचा अंगरखा घालीत असे...आणि पृथ्वीला प्रकाशित करणाऱ्या सूर्याप्रमाणे राजा सिंहासनावर बसत असे. सिंहासन स्वर्गाइतके उंच असून न्यायाच्या तेजाने प्रकाशमान होते'. अशा प्रकारे राजा हा सामान्यजनापेक्षा वेगळा आहे. त्याच्या हाती सत्ता एकवटण्याचा प्रयत्न येथे झालेला आहे.

मुघल सत्ता बलशाली बनत असतानाच राज्यकर्त्यांनी खिलाफतचे वर्चस्वही अमान्य केले. व आपली निरंकुश सत्ता निर्माण केली. 'ऐन-ए-अकबरी व 'अकबरनामा' मध्ये अकबराच्या राजपद सिद्धांताचे विश्लेषण केले आहे. सूर्यापासून निर्माण झालेला राजवंश, राजा या व्यक्तीमध्ये सामावलेली ईश्वरी शक्तीचा उल्लेख यात करण्यात आला आहे. अकबराच्याकडे निरंकुश सार्वभौम सत्ता एकवटली असली तरी लोककल्याणाची त्यास जोड होती. हक्क व कर्तव्ये, सत्ता व जबाबदाऱ्या यांचा सुरेख मेळ अकबर काळात दिसतो. 'शस्त्रधारण व राज्यविस्तार हे सर्व राजसिंहासन आणि राजमुगुटाच्या शोभेकरिता नसून प्रजापालनाकरिता आहे अशी अकबराची धारणा होती.

**अबुल फझल** म्हणतो, 'राजपद म्हणजे परमेश्वरापासून निर्माण झालेला प्रकाश व सूर्यापासून येणारा विश्वप्रकाशमान करणारा किरण होय'. यामुळे राजपदाची प्रतिष्ठा वाढली. परिणामतः राजपदावर वर्चस्व ठेवू पाहणाऱ्या व शरीयतचा अर्थ लावण्याच्या उलेमांच्या मक्तेदारीला धक्का बसला. अकबराने इ.स. १५७९मध्ये एक महजर प्रसिद्ध करून कायद्याचा आपला अन्वयार्थ उलेमा आपणावर लादू शकत नाहीत असे जाहीर केले. राजसत्ता आता



सर्वांत बलिष्ठ बनली. अकबराच्या काळात ती पूर्णत्वास पोहोचली. राजपदाबाबतची 'ईश्वरी अंश' ही हिंदूची कल्पना, ईश्वरदत्त हक्कांची युरोपियन कल्पना यांचा संगम अकबर काळात झालेला दिसून येतो.

जहांगिरने अकबराचेच धोरण पुढे चालविल्याने राजपदाच्या संकल्पनेत फारसा बदल झाला नाही. मात्र शहाजहानच्या कालखंडामध्ये यात बदल होत गेला व एकतंत्री स्वरूप प्राप्त होऊ लागले. औरंगजेब काळात यात आमूलाग्र बदल झाला. सर्वसमावेशक धोरण बाजूला पडले. कट्टर धार्मिकता जोपासली जाऊ लागली. पूर्वीच्या परंपरा मोडीत निघाल्या. हिंदूवर जिझिया कर, यात्रा कर आकारला गेला. त्यांची मंदिरे उद्ध्वस्त करण्याचे धोरण आखले गेले. परिणामतः हिंदूंच्यात असंतोष निर्माण होऊन तिने राजसत्ता खिळखिळी केली.

मुस्लीम राजे स्वतःला परमेश्वराचे प्रतिनिधी समजत असत. त्यामुळे राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाबाबत निश्चित नियम नव्हते. वारसा हक्कांबाबतच्या नियमांच्या अभावामुळे राजाविरुद्ध बंड, सत्ता बळकाविण्याचे प्रयत्न, यादवी व सिंहासनावरील हक्कदाराचे खून अशा अनेक घटना घडत असत. अकबराच्या वृद्धापकाळात त्याचा मुलगा सलीम (जहांगिर) ने बंड केले होते. शहाजहाननेही बापाविरुद्ध बंड करून त्यांचाच कित्ता पुढे गिरवला. बापाविरुद्ध बंड करण्याची परंपरा औरंगजेबाने चालू ठेवली. सत्ताप्राप्तीसाठी औरंगजेबाने शहाजहानला कैदेत ठेवले. स्वतःच्या भावांना ठार केले. वारसासंबंधीचे निश्चित नियम नसल्याने अशा घटना घडत होत्या.

इस्लामप्रमाणेच हिंदूमध्येही राजपद ईश्वरनिर्मित होते असे मानण्यात आले आहे. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात ही संकल्पना अस्तित्वात होती. मनु म्हणतो, 'इंद्र, अनिल, यम, अर्क, अग्नी, वरुण, चंद्र, कुबेर यांच्या शाश्वत अंशातून परमेश्वराने राजा निर्माण केला', राजाला मानवी रूपातील परमेश्वर मानले गेले. सभासदही छत्रपती शिवाजीराजे शिवाचा अवतार असल्याचे लिहितो. **बसवराज** राजाबद्दल म्हणतो की, 'राजा महेंद्राप्रमाणे प्रकाशतो. आपल्याकडील ऐश्वर्याचे तो प्रदर्शन करी. त्याच्या सर्वज्ञत्वामुळे त्यास शिव म्हणतात. राजा हा पर्वतासारखा निश्चल, शिवासारखा शक्तिमान, सागरासारखा गंभीर, आकाशासारखा सम, अग्नीसारखा प्रखर, क्रोधयुक्त, रुद्रासारखा विध्वंसक व वसुंधरेसारखा सहिष्णू असतो'. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात 'राजा' हा ईश्वरी अंश, प्रतिनिधी असल्याचे मानले गेले.

## मुघल प्रशासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये

**१. राजा हा ईश्वरी अंश :** राजाला ईश्वराचा अंश संबोधले गेल्यामुळे त्याच्या बऱ्या-वाईट कृत्याबद्दल त्यास जाब विचारता येत नसे. **अबुल फजल** म्हणतो, 'राजपद म्हणजे परमेश्वरापासून निर्माण झालेला प्रकाश व सूर्यापासून येणारा विश्वप्रकाशमान करणारा किरण होय'.

**२. निरंकुश राजेशाहीचा पुरस्कार :** सर्वच मुघल सम्राटांनी निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले आहे. सार्वभौमत्वावर भर देणारा मोंगोल जन्मसिद्ध हक्क आणि निरंकुश सत्तेवर तैमुर वंशाचा भर या दोन्हीमधून मुघलांनी आपली निरंकुश सत्ता निर्माण केली. उलेमांचे वर्चस्वही झुगारून राजसत्ता ही सर्वांत बलशाली असते हे अकबराने दाखवून दिले.

Scanned with CamScanner

**३. कल्याणकारी शासनव्यवस्था :** अकबराच्या काळात लोककल्याणावर भर दिल गेला. राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी राजाची होती. एका साध्या अर्जाच्या द्वारेही एखाद व्यक्ती राजाकडे न्याय मागू शकत असे. History of Jahangir या ग्रंथामध्ये **डॉ. बेनीप्रसाद** म्हणतात, 'मुघलांची शासनव्यवस्था ही तुर्कांच्या शासनव्यवस्थेपेक्षा जास्त लोकाभिमुख आणि कल्याणकारी होती'. अकबराने उत्कृष्ट शासनव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात, 'न्यायाच्या दृष्टीने मी स्वतः अन्यायी व दोषी ठरलो तरी स्वतः विरोधी निर्णय घेण्यास मी बांधलेला आहे. मुघल शासनव्यवस्थेबाबत **डॉ. एस. आर. शर्मा** म्हणतात की, "मुघलांनी शासनव्यवस्था अशा तऱ्हेने निर्माण केली होती की, त्यामुळे ते भारतीय प्रजेचे चाहते बनले. मुघल सम्राटांनी प्रजेशी निकटचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता".

**४. अकबराचे प्रशासन म्हणजे इराणी, अरबी व भारतीय पद्धतीचा संगम :** इराणी व अरबींच्या चांगल्या गोष्टी अकबराने स्वीकारल्या होत्या. भारतीय परंपरांचाही प्रभाव अकबराव पडला होता. या सर्वांमधून चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून प्रशासन चालविण्याचा अकबराने प्रयत्न केला. याबाबत Mughal Administration या ग्रंथात **जदुनाथ सरकार** म्हणतात, 'अकबराच्या प्रशासनाची तत्त्वे, पदाची नावे, दर्जा व कार्यपद्धती इत्यादी पर्शियन पद्धतीची होती. प्रांतीय शासनपद्धती ही अरबी पद्धतीची होती तर स्थानिक प्रशासन हे भारतीय परंपरेतील होते. मुघल शासनव्यवस्था ही भारतीय चौकटीत बसविलेली इराणी–अरबी राज्यव्यवस्था होती'.

**५. एकवाक्यता :** अकबराच्या शासनव्यवस्थेत एकवाक्यता होती. केंद्र, प्रांत, जिल्हा, तालुका व ग्राम अशी उतरत्या पद्धतीची श्रेणी होती. एकाचा दुसऱ्यावर अकुंश होता. वरिष्ठांचे आदेश कनिष्ठ अधिकाऱ्यांना पाळावे लागत. आपल्या कामाबाबत ते वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार राहत.

**६. रोख पगार :** व्यक्तीची योग्यता पाहून त्यास सरकारी नोकरीत प्रवेश मिळत असे व गुणानुसार त्यास बढती मिळे. वंशपरंपरेने पदे दिली जात नसत. सरकारी नोकरीचा मोबदला म्हणून रोख पगार दिला जात होता. सैन्यव्यवस्थेसाठी मनसबदारी पद्धतीचा अवलंब केला जात होता.

**७. अधिकाऱ्यांच्या बदल्या :** सरकारी अधिकारी एकाच ठिकाणी राहिल्यामुळे त्याचे त्या ठिकाणी आर्थिक हितसंबंध निर्माण होऊ नयेत म्हणून तसेच त्याने आपला प्रभाव निर्माण करून शासनास अडथळा करू नये यासाठी त्याची दोन ते तीन वर्षांत बदली केली जात असे.

**८. प्रशासकीय व्यवहाराचे लेखी स्वरूप :** मुघल काळातील सर्व व्यवहार हे लेखी स्वरूपात चालत असत. मनसबदारांना त्यांची मनसब लेखी स्वरूपात मिळत असे. न्यायनिवाडा हा लेखी स्वरूपात दिला जात असे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कनिष्ठ अधिकाऱ्यांना जे आदेश मिळत ते ही लेखी स्वरूपात असत. मोहिमावरील नियुक्त्यांचे आदेशही याच प्रकारे दिले जात असत. मुघल काळात लेखी व्यवहाराला महत्त्व प्राप्त झाले होते. म्हणून मुघल शासनास जदुनाथ सरकारांनी **The Paper Government** असे संबोधले आहे.

**९. हिंदूंनाही प्रशासनात स्थान :** हिंदूंच्या ज्ञानाचा, त्यांच्या कर्तबगारीचा फायदा मुघल प्रशासनास व्हावा यासाठी अकबराने हिंदूंना प्रशासनातील वरिष्ठ पदेही देऊ केली. निष्ठावंत





रजपुतांच्या पाठिंब्यामुळे अकबराला आपले साम्राज्य उभारता आले. बंडखोरांचा बंदोबस्त करता आला. प्रशासनात हिंदू–मुस्लिमांना समानतेचा दर्जा देण्यात आला. यामुळे मुघल सम्राटाप्रती आपलेपणाची भावना हिंदूमध्ये निर्माण झाली. राजा मानसिंग, राज तोरडमल, पंडित बिरबल हे सम्राट अकबराचे वरिष्ठ मनसबदार होते.

**१०. प्रशासनाचे लष्करी स्वरूप :** मुलकी, महसूल न्याय विभागातील अधिकाऱ्यांना फक्त त्यांचे काम पाहावे लागत होते असे. नाही तर वेळप्रसंगी त्यांना युद्ध मोहिमेवर जावे लागत होते. प्रशासनामधील अधिकाऱ्यांची नियुक्ती ही लष्करी अधिकारी म्हणून होत होती. लष्करी अधिकाऱ्यांबरोबरच मुलकी अधिकारी, महसूल अधिकारी व न्यायाधीश हे सर्व मनसबदार होते. अकबराने १० स्वारांपासून ते १० हजार स्वारांपर्यंत मनसब दिली होती. तलवारीच्या खणखणाटावरती राज्य वाढण्याच्या या कालखंडात सर्वच अधिकाऱ्यांना लष्करी स्वरूपाची कामगिरी पार पाडावी लागत होती.

## मुघलांची प्रशासन व्यवस्था

सम्राट अकबराच्या मध्यवर्ती प्रशासन व्यवस्थेचे ५ प्रमुख विभाग होते.

१. केंद्रीय मध्यवर्ती प्रशासन
२. प्रांतीय प्रशासन
३. जिल्हा (सरकार) प्रशासन
४. तालुका (परगणा) प्रशासन
५. ग्राम प्रशासन

### १. केंद्रीय मध्यवर्ती प्रशासन


सम्राट अकबर

**१. सम्राट :** मुघल सम्राटाच्या हाती राज्याची सर्व सत्ता एकवटलेली होती. त्यांच्या सत्तेवर कोणाचाही अकुंश नव्हता. राजाकडे लष्करी, मुलकी व न्यायविषयक अधिकार एकवटले होते. याबाबत **जदुनाथ सरकार** म्हणतात की, "Muslim State was essentially a millitary state and depended for its existence on the absolute authority of the monarch, who was also its supreme general". सम्राटाने कुराणाचे उल्लंघन केल्यास त्यास पदच्युत करण्याचा अधिकार उलेमांना होता. परंतु मुघल सम्राट आपली शक्तिशाली सत्ता स्थापन करण्यात यशस्वी झाले होते. अकबराने तर उलेमांकडे असणारे सर्वोच्च धार्मिक अधिकार आपणाकडे एकवटले. स्वतःला मुस्लिमांचा

Scanned with CamScanner

आध्यात्मिक गुरू म्हणून घोषणा केली. ही परिस्थिती मुघल कालखंडात थोडा फार बदल होऊन टिकून होती.

साम्राज्यातील उच्चपदस्थ अधिकारी, मंत्री यांच्या नेमणुका स्वतः सम्राट करत असे. सम्राटाशिवाय हा अधिकार इतर कोणासही नव्हता. सिंहाची शिकार करणे, हत्तीच्या झुंजीचा हुकूम देणे, दर शुक्रवारी पालखीमधून जामा मशिदीत जाऊन प्रार्थना करणे, सुवर्णतुला करणे इत्यादी अधिकार केवळ सम्राटाकडे एकवटले होते. मुघलसम्राट दर्शनीय मंझिल किंवा हुजूर महलमधून सकाळी आपल्या प्रजेला दर्शन देत असत. या जागेस 'झरोका-ए-दर्शन' किंवा सलामीचा सज्जा असे म्हटले जाई. झरोका दर्शनाच्यावेळी संगीतकार, गायक उपस्थित जमावाचे मनोरंजन करत असत. सम्राटाची स्तुती गाणारे कवी व भाटही असत. ते म्हणत 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' मंत्रीगण, सरदार राजवाड्याभोवती फेऱ्या मारून राजाला वंदन करत तर प्रजाजन बादशहाचे दर्शन होताच जमिनीला डोके किंवा हात टेकून कुर्निसात करत असत. दरबारी कामकाज, मंत्री व अधिकाऱ्यांबरोबरच्या चर्चा, सामान्यजनांचे प्रश्न, न्यायनिवाडे यामध्ये सम्राट दिवसभर व्यस्त असे. **डॉ. ईश्वरीप्रसाद** यांनी याबाबत म्हटले आहे की, 'The emperor himself was the guiding spirit of all reforms and policies and it was his master mind which grasped the minutest details of government and made possible the smooth working of the whole machinery'.

**२. मंत्री व मंत्रालये :** सम्राट राज्यकारभाराच्या सोईसाठी अनेक मंत्र्यांची नियुक्ती करत असत. नित्याच्या कामाबाबत मंत्र्यांना स्वातंत्र्य दिले होते. मंत्री राजाला सल्ला देत असत. परंतु हा सल्ला राजावर बंधनकारक नसे. मंत्री आपले पद टिकविण्यासाठी राजाची मर्जी सांभाळण्यात मशगूल असत. **मंत्र्यांची संख्या ४ ते ८ पर्यंत असे.**

***१. प्रधानमंत्री किंवा वजीर :*** प्रशासनाचा प्रमुख म्हणून वजिराला कामगिरी पाहावी लागे. सम्राटाला सल्ला देण्याचे काम तो करत असे. तसेच सम्राट व मंत्री यांच्यामधील दुवा म्हणून वजिराला काम करावे लागे. त्याच्याकडे अर्थविभागही असल्यामुळे त्यास दिवाण असेही म्हणतात. बैरामखानने अकबराचा 'दिवाण' (वजीर) म्हणून कामगिरी पार पाडली. बैरामखानास (वकील) असेही म्हटले जाई. वजिरास सम्राटाच्या अनुपस्थितीत राज्यकारभार पाहावा लागे. सम्राट अल्पवयीन असेल तर वजीरच सम्राटाच्या नावे राज्यकारभार पाहत असे. सैन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती व बढती देण्याचे काम, राज्याच्या जमाखर्चावर नियंत्रण ठेवण्याचे काम व महसूल वसुली संबंधीच्या बाबतचे निर्णय इत्यादी कामे वजीरास पार पाडावी लागत.

**२. दिवाण (अर्थमंत्री) :** दिवाण हा वजिरानंतरचा महत्त्वपूर्ण मंत्री होय. अकबराच्या काळात राजा तोरडमल हा कार्यक्षम अर्थमंत्री झाला. बैरामखान हा वजीरपदाबरोबरच अर्थखात्याचाही व्यवहार पाहत होता. बैरामखानाच्या अस्तानंतर अकबराने वजिराचे अधिकार कमी केले व अर्थखात्याची जबाबदारी दिवाण या स्वतंत्र मंत्र्याकडे सुपूर्द केली. अर्थमंत्र्याला राज्याच्या जमाखर्चाचा कारभार पार पाहावा लागे. राज्याच्या महसुलाबाबत अनेक कायदे त्यास तयार करावे लागत. अर्थखात्याच्या व्यापामुळे दिवाण आपणास साहाय्यक दिवाणाची नियुक्ती



करत असे. या साहाय्यकांना दिवाण-इ-खालसा व दिवाण-इ-जहांगिर असे म्हटले जाई. पैकी दिवाण-इ-खालसा राखीव जमिनींची महसूल व्यवस्था पाहात असे तर दिवाण-इ-जहांगिर बक्षिसादाखल देण्यात आलेल्या जमिनीची महसूल व्यवस्था पाहात असे. तसेच साहिब-इ-तावजी या अधिकाऱ्याकडे लष्करी लेखा परीक्षणाचे काम होते तर दिवाण-ई-वायुदूत याच्याकडे कारखान्यांच्या लेखा परीक्षणाचे काम होते. थोडक्यात, अर्थखात्याला राज्याचा खजिना, जमाखर्च, जमीन महसूल, शेती विकास इत्यादी कामे पार पाडावी लागत. या खात्याचा कारभार पार पाडण्यासाठी कर्मचारी वर्गाची नियुक्ती केली जात असे. या महत्त्वपूर्ण खात्याच्या कामामध्ये स्वतः अकबर जातीनिशी लक्ष घालत असे.

**३. मीर बक्षी (युद्ध मंत्री) :** लष्करासंबंधीचे सर्व कामकाज मीर बक्षी यास पार पाडावे लागे. साम्राज्यवाढीवर दिलेला भर, राज्यांतर्गत बंडखोरी यामुळे या खात्यास सतत दक्ष राहावे लागे. मीर बक्षीला सैन्य मंत्री म्हणून अनेक कामे पार पाडावी लागत. ती याप्रमाणे -

१. राज्यातील सर्व मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांची (मनसबदारांची) दर्जा, पगार व नाव याबाबतची नोंद ठेवणे.

२. सैन्याच्या पगारवाटपाचे काम पार पाडणे.

३. लष्करी मोहिमांचे नियोजन करणे.

४. राजाला लष्करासंबंधी माहिती देण्याचे कार्य त्यास पार पाडावे लागे.

५. राजवाड्याच्या संरक्षणाची जबाबदारी मीर बक्षीकडे असे.

६. राज्यात गुप्तहेरांच्या नेमणुका करणे, ठिकठिकाणी बातमीदार नेमणे याबाबतची कामे युद्धमंत्र्यास पार पाडावी लागत.

७. लष्करभरती, त्यांचे प्रशिक्षण, युद्ध साहित्य याबाबतची कामगिरी मीर बक्षीला पार पांडावी लागे.

८. मीर बक्षीला अनेक साहाय्यक नेमणुकीचा अधिकार होता.

९. मनसबदारांच्या घोडदळांची संख्या मीर बक्षी ठरवित असे. मनसबदारांकडे असणाऱ्या घोड्यांना डाग देण्याची जबाबदारी मनसबदारांची असे.

**४. सद्-इ-सदर (धर्मदाय मंत्री) :** धर्मदाय विभागाचा हा प्रमुख होय. विविध प्रकारची धार्मिक कार्ये त्यास पार पाडावी लागत होती. त्याच्या कामाचे स्वरूप खालीलप्रमाणे होते.

१. राजाला धार्मिक बाबतीत सल्ला देण्याचे काम धर्मदाय मंत्र्यास करावे लागे.

२. राजातर्फे दानधर्म करण्याचा अधिकार धर्मदाय मंत्र्यास होता.

३. कुराणामधील आज्ञांचे राज व प्रजाजन यांचेकडून योग्य पालन होते की नाही हे पाहणे.

४. इस्लाम धर्म व विद्या यांना चालना मिळेल हे पाहणे.

५. प्रांतिक व स्थानिक धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे.

६. मशीद व धार्मिक तीर्थक्षेत्रांची व्यवस्था पाहणे.

७. इस्लामच्या धार्मिक संस्थांना मदत करणे.

८. कलावंत व विद्वानांना आर्थिक मदत करणे.

Scanned with CamScanner

९. सम्राटाचे निर्णय धर्मतत्त्वाविरुद्ध जाणार नाहीत याची काळजी घेणे.

१०. धार्मिक कार्य पार पाडणाऱ्यांना राजाकडून मिळालेली जमीन व देणगी यांचा हिशे[ब] ठेवणे.

५. **काजी-उल-कजात (न्यायमंत्री) :** राज्याचा सर्वोच्च न्यायाधीश हा सम्राटच अ[से]. सम्राटानंतरचा न्यायखात्याचा प्रमुख म्हणून न्यायमंत्र्यास काम पाहावे लागे. मुघल काळा[त] न्यायमंत्र्याच्या हाती अनेक अधिकार एकवटले होते. प्रांत, जिल्हा व नगर काजींच्या नियुक्ती[चे] अधिकार याचेकडे होते. तसेच इस्लाम कायद्यानुसार धार्मिक खटल्यांची सुनावणी न्यायमंत्र्या[स] करावी लागे. एखाद्या व्यक्तीस साधा अर्ज करून न्याय मागण्याची तरतूद मुघल काळात होत[ी] तरीही न्यायव्यवस्था निष्पक्षपाती नव्हती असे Mughal Administration या ग्रंथात जदुना[थ] सरकार यांनी म्हटले आहे.

६. **दरोगा-ए-डाकचौकी (पत्रव्यवहार व गुप्तहेर विभागप्रमुख) :** या खात्या[च्या] प्रमुखास गुप्तहेरांच्या नेमणुका करून राज्यकारभाराची व शत्रूच्या गोटातील माहिती त्यांच्याकडू[न] मिळवून ती राजास सादर करावी लागे. त्याचबरोबर अनेक समाचार लेखकांच्या नियुक्ती[चे] अधिकार गुप्तहेर विभाग प्रमुखास होते. मध्ययुगीन कालखंडामध्ये गुप्तहेर विभागास अतिश[य] महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते.

७. **मीर आतीष (तोफखाना विभाग प्रमुख) :** हा तोफखान्याचा मुख्य अधिका[री] होय. संपूर्ण तोफखान्याची व्यवस्था या अधिकाऱ्यास पार पाडावी लागे. तोफा, बंदुका, दारूगो[ळा] यांची निर्मिती करणे, त्यांची व्यवस्था लावणे, महत्त्वपूर्ण किल्ल्यांवर तोफांची व्यवस्था ठेवणे [व] तोफखान्याबाबतची ताजी माहिती या अधिकाऱ्यास पार पाडावी लागत असे.

८. **खान-ए-सामा (सम्राटाचा खाजगी चिटणीस) :** सम्राटाचा खाजगी चिटणी[स] म्हणून यास कामगिरी पार पाडावी लागे. राजगृहाची व्यवस्था पाहणे, सम्राट व त्यांचे राजकुटुं[ब] जनानखाना यांना लागणारी वस्त्रभूषणे यांची व्यवस्था करणे, सम्राटाच्या भोजनाची व्यवस्[था] ठेवणे, राजकुटुंबाच्या गरजांची पूर्तता करणे इत्यादी कामे या चिटणिसास करावी लागत. [हा] सतत सम्राटाच्या संपर्कात असल्याने या पदास महत्त्व प्राप्त झाले होते.

९. **मुघलांच्या मध्यवर्ती प्रशासनातील इतर अधिकारी व त्यांचे कार्य**

| पद | कामे |
|---|---|
| १. मुहतसिब | जनतेचा सदाचार निरीक्षक म्हणून काम पाहणे. |
| २. मीर-इ-तोजिह | सैन्याबाबतच्या खर्चाचा हिशेब ठेवणे. |
| ३. दिवाण-इ-खालसा | राखीव जमिनीची महसूल व्यवस्था ठेवणे. |
| ४. दिवाण-इ-जहांगीर | बक्षीसपात्र जमिनींची महसूल व्यवस्था पाहणे. |
| ५. मीर-इ-बर | जंगलाची व्यवस्था ठेवणे. |
| ६. मीर-इ-बहर | लढाऊ व व्यापारी जहाजांच्या निर्मितीचे काम पाहणे. |
| ७. मीर-इ-मश्रिफ | उत्पन्न व खर्च यांच्या नोंदी ठेवणे. |



अकबराच्या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेमध्ये अनेक लहान-लहान विभाग होते. ते प्रशासनास, मुख्य खात्यास साहाय्य करत होते. मात्र त्यांचे महत्त्व दुय्यम स्वरूपाचे होते. याबाबत **डॉ. जदुनाथ सरकार** म्हणतात की, 'वजीर अथवा दिवाण वगळल्यास बाकीच्या केंद्रीय मंत्र्यांचा दर्जा फारच खालचा असल्याने त्यांना मंत्री म्हणण्यापेक्षा सम्राटाचे आदेश अमलात आणणारे सचिव म्हणणे अधिक योग्य होईल'.

सम्राट अकबराने आपली उत्कृष्ट राज्यकारभार यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक खात्याचा कारभार पाहण्यासाठी कुशल प्रशासकांची नियुक्ती केली. इ.स.१५८३ मध्ये सम्राट अकबराने निर्माण केलेल्या मध्यवर्ती राज्यकारभारातील महत्त्वाचे अधिकारी पुढीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| १. मुलकी न्याय खाते | : राजा बिरबल |
| २. सार्वजनिक बांधकाम खाते | : नौरंगखान |
| ३. कृषी | : राजा तोरडमल |
| ४. धर्मविषयक खाते | : राजपुत्र दानियल |
| ५. तनखा व धर्मादाय खाते | : सुलतान ख्वाजा |
| ६. फौजदारी खटल्यांचा निवाडा | : राजपुत्र सलीम |
| ७. वस्तूंच्या किमतीवर नियंत्रण | : झैनखान कोका |
| ८. बेवारस मालमत्तेची व्यवस्था | : शरीफखान |
| ९. बादशाही छावणीच्या जागा | : राजपुत्र मुराद |

## २. प्रांतिक प्रशासन

राज्यकारभाराच्या सोईसाठी साम्राज्याचे जे विभाग केले होते त्यास प्रांत/सुभा असे म्हणतात. प्रत्येक प्रांतात सिपहसालार (राज्यपाल) दिवाण, काझी, बक्षी, कोतवाल इत्यादी अधिकारी असत. ते आपापल्या विभागाचा कारभार पार पाडत असत. प्रांतिक प्रशासनाबाबत सर जदुनाथ सरकार म्हणतात, 'मुघल साम्राज्यात निर्माण करण्यात आलेली प्रांतीय व्यवस्था म्हणजे मध्यवर्ती कारभाराचीच छोटी प्रतिकृती होती'. सम्राट अकबराने जिंकलेल्या सुभ्यांना एक प्रशासन व्यवस्था दिली; ती मध्यवर्ती शासनाप्रमाणेच होती. या सुभ्यांचा/प्रांतांचा कारभार पाहण्यासाठी श्रेणीबद्ध प्रशासन यंत्रणा निर्माण केली होती. इ.स.१६०२ मध्ये अकबराच्या प्रांतांची संख्या १५ होती. ते प्रांत याप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| (१) दिल्ली | (६) अवध | (११) बंगाल |
| (२) आग्रा | (७) काबूल | (१२) अहमदाबाद |
| (३) लाहोर | (८) माळवा | (१३) खानदेश |
| (४) मुलतान | (९) अजमेर | (१४) वऱ्हाड |
| (५) अलाहाबाद | (१०) बिहार | (१५) अहमदनगर |

Scanned with CamScanner

सम्राट औरंगजेबाच्या कालखंडामध्ये दक्षिणेकडील अनेक प्रांत मुघल साम्राज्यात समावि झाले. त्याच्या सुभ्यांची संख्या २१ होती. ती याप्रमाणे दिल्ली, आग्रा, लाहोर, मुलतान, अलाहाबाद, अवध, काबूल, माळवा, अजमेर, बिहार, बंगाल, गुजरात, खानदेश, वऱ्हाड, ठठ्ठा, ओरिसा, औरंगाबाद, विजापूर, बीदर, हैद्राबाद व काश्मीर.

**१. प्रांतप्रमुख किंवा सुभेदार (सिपहसालार) :** प्रांताचा मुख्य अधिकारी म्हणज राज्यपाल होय. अकबर कालखंडामध्ये प्रांतप्रमुखास 'सिपहसालार' असे म्हटले जाई. उत्त मुघल काळात यास नाजिम किंवा सुभेदार हे नाव प्राप्त झाले. सुभेदारास मोठ्या प्रमाणात अंतर्गत स्वायत्तता होती. प्रांताचा सर्व कारभार त्याच्या ताब्यात असल्यामुळे सम्राट या पदावर अत्यंत विश्वासू व्यक्तीची नियुक्ती करत असे. प्रामुख्याने प्रांताचा प्रमुख म्हणून राजपुत्र, राज परिवाराचा सदस्य किंवा योग्य सेनापती यांची नियुक्ती होत असे. ही नियुक्ती ३ ते ५ वर्षांसाठी असे व वरचेवर त्यांच्या बदल्या केल्या जात. प्रांत प्रमुखास खालील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत.

१. प्रांतामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवणे हे प्रांतप्रमुखाचे मुख्य कार्य होय.
२. प्रांतातील प्रजेच्या कल्याणाचे निर्णय घेणे. यामध्ये रस्ते, कालवे, दवाखाने, धर्मशाळा, उद्याने यांची निर्मिती करणे.
३. न्यायविषयक अधिकारही सुभेदारास होते. एखाद्यास फाशीची शिक्षा द्यावयाची झाल्यास त्यासाठी राजाची मान्यता घेणे आवश्यक होते.
४. प्रांतातून शेतसारा वसूल करणे, इतर करांची वसुली करणे.
५. प्रांतातील मांडलिक राजाकडून खंडणी वसूल करणे.
६. सम्राटाच्या आदेशानुसार जवळच्या राज्यावर चढाई करणे.
७. प्रांतिक लष्कराची व्यवस्था ठेवणे.
८. विद्रोही जमीनदार, सरंजामदार यांचा बंदोबस्त करणे.
९. राजाकडे योग्य अधिकाऱ्यांच्या निवडीबाबत शिफारस करणे.
१०. प्रांतातील धार्मिक तीर्थक्षेत्रांची व्यवस्था पाहणे. प्रजेच्या धार्मिक हितसंबंधातील जपणूक करणे.
११. प्रांताचे उत्पन्न व खर्च यामध्ये मेळ घालणे.
१२. शेतकऱ्यांचे रक्षण करून शेती विकासाच्या योजना आखणे.

**२. प्रांतीय दिवाण :** प्रांतीय प्रशासनातील सुभेदारानंतरचा महत्त्वपूर्ण अधिकारी म्हणजे दिवाण होय. प्रांतीय सुभेदार व प्रांतीय दिवाण यांचे परस्परांवर नियंत्रण असे. ते एकमेकांचा गुप्त अहवाल सम्राटाकडे पाठवत असत. प्रांतीय दिवाणांची कामे खालीलप्रमाणे -

१. प्रांतामधून शेतसारा व अन्य करांची वसुली करणे.
२. प्रांतातून महसूल वसुलीसाठी अमीन, आमील अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करून करवसुलीचे काम त्यांच्याकडून करवून घेणे.



३. प्रांतीय खजिन्यावर नियंत्रण ठेवणे.
४. दिवाणी खटल्याचे कामकाज चालविणे.
५. शेतीच्या उन्नतीसाठी शेतकऱ्यांना (तगाई) कर्ज देणे.
६. दुष्काळ, महापूर अशा नैसर्गिक संकटांच्या प्रसंगी शेतकऱ्यांना मदत करणे.
७. धार्मिक स्थळांना, साधुसंतांना दिलेल्या जमिनीवर देखरेख ठेवणे.
८. प्रांतातील प्रजेची काळजी घेणे.
९. आपल्या खात्याचा अहवाल केंद्रीय वजिराकडे पाठविणे.

**३. प्रांतीय सदर किंवा काझी (न्यायप्रमुख) :** प्रांतीय दिवाणानंतर काझीला महत्त्वपूर्ण स्थान होते. त्याची नियुक्ती मध्यवर्ती कायदेमंडळातील सद्-इ-सदर (धर्मदाय मंत्री) कडून होत असे. त्यास धर्माचे चांगले ज्ञान असावयास हवे. तसेच तो प्रामाणिक व चारित्र्यसंपन्न असावयास हवा. काझीस खालील कामे पार पाडावी लागत.

१. जमीन दान देण्याबाबत व आर्थिक मदतीबाबत केंद्र सरकारला शिफारस देणे.
२. प्रांतीय व जिल्हा पातळीवरील काझीच्या कारभारावर देखरेख ठेवणे.
३. प्रांतामधील विविध धर्मियांमध्ये एकवाक्यता राखणे व धार्मिक नीतिनियमाबाबत काळजी घेणे.
४. धार्मिक वाद-विवादाबाबत योग्य तो न्याय देणे.
५. कनिष्ठ जिल्हा स्तरावरील व प्रमुख शहरांतील न्यायालयामधील न्यायाधीशांच्या नेमणुकाबाबत शिफारस देणे.

**४. प्रांतीय बक्षी (प्रांतीय सैन्यप्रमुख) :** केंद्र सरकारचा मीर बक्षी प्रांतीय बक्षीची निवड करत असे. प्रांतीय सैन्य प्रमुख म्हणून त्यास पुढील कामे पार पाडावी लागत.

१. प्रांतीय सैन्याची भरती करणे.
२. प्रांतातील सैन्यामध्ये शिस्त व कार्यक्षमता राखणे.
३. प्रांतातील बंडखोरीस आळा घालणे.
४. प्रांतीय लष्कराची माहिती केंद्रीय मीर बक्षीला कळविणे.

**५. कोतवाल (प्रांत पोलीस प्रमुख) :** मुघल कालखंडामध्ये प्रमुख शहरे, व्यापारी बंदरे यांचा कारभार पाहण्यासाठी केंद्र सरकारकडून कोतवालाची नियुक्ती केली जात असे. त्याची कामे पुढीलप्रमाणे -

१. शहरामध्ये शांतता, सुव्यवस्था राखणे.
२. शहराच्या संरक्षणासाठी लष्कराची तयारी ठेवणे.
३. रात्रीचा पहारा ठेवणे, गस्त घालणे व शहर भयमुक्त करणे.
४. राज्यात आलेल्या परकीय लोकांवरती लक्ष ठेवणे.
५. शहरातील उद्योग व बाजारपेठांचे रक्षण करणे.

Scanned with CamScanner

६. वस्तूंचे भाव नियंत्रित ठेवणे.
७. शहरामधील अवैध धंद्यावर नियंत्रण ठेवणे, मादक पदार्थांचा व्यापार, वेश्याव्यवसाय यांच्यावर निर्बंध घालणे.
८. शहरामधील आरोग्य, शिक्षण आदी सामाजिक सुविधांकडे लक्ष ठेवणे.
९. राज्यातील स्मशाने व कत्तलखाने याबाबत लक्ष देणे.
१०. शहरातील बेवारस मालमत्ता सरकारजमा करणे.

### ३. जिल्हा (सरकार) प्रशासन

प्रांतापेक्षा लहान विभागांना जिल्हा किंवा सरकार असे संबोधले जाई. प्रत्येक प्रांत अनेक जिल्ह्यांमध्ये विभागला जात असे. जिल्ह्यांमध्ये फौजदार, अमलगुजार, बितिकची, खजिनदार इत्यादी अधिकारी असत. त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे -

**१. फौजदार किंवा जिल्हाप्रमुख :** जिल्ह्याच्या राज्यकारभाराची जबाबदारी फौजदारावर असे. फौजदार हा लष्करी अधिकारी असून त्याच्याकडे आवश्यक तेवढी फौज असे. फौजदारावर महत्त्वपूर्ण जबाबदारी असल्यामुळे त्यांच्या कार्याच्या पाहणीसाठी अकबर केंद्रीय अधिकाऱ्यांना पाठवित असे. फौजदाराची कामे याप्रमाणे -

१. जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवणे.
२. जिल्ह्यामधील चोर, लुटारूंचा बंदोबस्त करणे.
३. जिल्ह्यातील प्रजेच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे.
४. आपल्या सहायक अधिकाऱ्यावर लक्ष देणे व जिल्ह्याचा कारभार चालविणे.
५. परगण्यातील (तालुका) अधिकाऱ्यावर नियंत्रण ठेवणे.
६. महसूल अधिकाऱ्यांना त्यांच्या कामी मदत करणे.
७. जिल्ह्यातील जमीनदारांवर नियंत्रण ठेवणे.
८. सुभेदारांच्या आज्ञांचे पालन करणे.

**२. अमलगुजार किंवा जिल्हादिवाण :** हा महसूल अधिकारी असून जिल्ह्याचा महसूल गोळा करण्याची, तो सरकारजमा करण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती. त्याचे कार्य पुढीलप्रमाणे -

१. जिल्ह्याचा महसूल गोळा करणे व तो प्रांतीय दिवाणाकडे पाठविणे.
२. जिल्हा महसूल वाढीसाठी प्रयत्न करणे.
३. शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करणे व याबाबतचा अहवाल प्रांताच्या दिवाणाकडे पाठविणे.
४. जमिनीचे स्वरूप व घेण्यात येणारी पिके यानुसार महसूल ठरविणे.
५. नैसर्गिक संकटप्रसंगी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे, नवीन कर्जे देणे.
६. जिल्हा खजिनदाराच्या कामावर लक्ष देणे, तालुका स्तरावरील महसूल अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.



**३. जिल्हा हिशेबप्रमुख किंवा बितिकची :** अमलगुजार या अधिकाऱ्यास मदत करण्यासाठी बितिकची या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येई. त्याची कामे खालीलप्रमाणे -

१.जिल्हा कोषागारात जमा झालेल्या महसुलाचा हिशेब ठेवणे.
२. जिल्ह्यांतर्गत परगण्यातील महसूल वसुलाबाबतची हिशेबपत्रके तयार करणे.
३. आपल्या हाताखालील पटवारी, मुकादम यांच्याकडून येणाऱ्या कागदपत्रांची तपासणी करणे.

**४. जिल्हा खजिनदार :** जिल्हा प्रशासनातील हा चौथा महत्त्वपूर्ण अधिकारी होय. त्याची कामे खालीलप्रमाणे -

१. जिल्ह्यातील महसूल वसूल करून तो केंद्रीय कोषागाराकडे पाठविणे.
२. जिल्ह्यातील शेतसारा व इतर करांबाबतची कागदपत्रे एकत्र करणे व याबाबतचा तपशील जिल्हाप्रमुखास देणे.

### ४. परगणा किंवा तालुका प्रशासन

जिल्ह्याची विभागणी निरनिराळ्या परगण्यांमध्ये झालेली असे. परगण्याचा कारभार पाहण्यासाठी शिकेदार, अमीन, पोतदार व कानूनगो हे महत्त्वाचे अधिकारी होते. त्यांच्या कामकाजाचे स्वरूप खालीलप्रमाणे -

**१. शिकेदार किंवा तहसीलदार :** परगण्याच्या प्रमुख शिकदारास अनेक स्वरूपाची कामे पार पाडावी लागत असत. ती याप्रमाणे -

१. परगण्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे.
२. परगण्याच्या सुरक्षेसाठी सैन्याची व्यवस्था ठेवणे.
३. परगण्याच्या न्यायव्यवस्थेचे कामकाज पाहणे.
४. गुन्हेगारांवर खटले चालवून त्यांना शिक्षा ठोठावणे.

**२. अमीन किंवा मुनशीप :** परगण्याचे शेतसारा वसुलीचे अधिकार याच्याकडे देण्यात आले होते त्याची कामे खालीलप्रमाणे -

१. अनेक निकषांनुसार शेतसारा निश्चित करणे.
२. परगण्याचा शेतसारा गोळा करणे.
३. जिल्हा महसूल अधिकाऱ्यांना साहाय्यक म्हणून काम करणे.

**३. पोतदार किंवा खजिनदार :** हा परगण्याचा खजिनदार होय.

१. पैशाच्या देवाणघेवाणीचे काम करणे.
२. परगण्याचा खजिना सांभाळणे.

वरील अधिकाऱ्यांबरोबरच परगण्याचा कारभार पाहणाऱ्यांमध्ये वितिक्की म्हणजे लेखन कार्य करणारा व हिशेब लिहिणारा अधिकारी होता. त्याचबरोबर कानूनगो, चौधरी इत्यादी अधिकारीही परगण्याच्या कामकाजात भाग घेत असत.



Scanned with CamScanner

### ५. ग्रामीण प्रशासन

प्राचीन भारतातील ग्राम प्रशासनाप्रमाणेच खेड्याचीही स्वतंत्र प्रशासन यंत्रणा मुघल काळात होती. ग्रामीण प्रशासन व्यवस्थेत फारसे बदल झाले नाहीत. मुकादम (पाटील) हा गावचा प्रमुख अधिकारी असे. त्याच्या मदतीला पटवारी व चौकीदार हे अधिकारी होते. पटवारी हा शेतसारा वसूल करत असे तर चौकीदार हा जमिनीबाबतची माहिती ठेवत असे. खेड्यांची संरक्षणव्यवस्था, शिक्षण व्यवस्था, स्वच्छता इत्यादी कामे ग्रामपंचायतीला करावी लागत असत. गावातील तंटे-बखेडे सोडविण्याचे काम ग्रामपंचायतीस करावे लागत असे. जातीबाबतचे वाद जातपंचायतीकडे जात असत. त्याचबरोबर धार्मिक उत्सव साजरे करण्याचे काम ग्राम प्रशासन पार पाडत असे.

### सम्राट अकबराची महसूल व्यवस्था

जमीन महसूल हा उत्पनाचा मुख्य भाग होता. अकबराने आपल्या जमीन महसूल व्यवस्थेत सुसूत्रता आणली. चांगल्या अधिकाऱ्यांची या कामी नियुक्ती केली. महसूलवाढीसाठी प्रयत्न केले. अकबराच्या जमीन महसुलाबाबत डॉ. **ईश्वरीप्रसाद** म्हणतात, 'Akabar's accession to the throne marked a new era in the history of administrative reform. Like every thing else the revenue department also felt a master's touch'. जमीन महसूल क्षेत्रात शेरशहाने जे धोरण स्वीकारले होते तेच धोरण पुढे अकबराने चालविले. काही दोष होते ते दूर करण्याचा प्रयत्न केला. अकबर सत्तेवर आला तेव्हा दोन प्रकारच्या जमिनी होत्या. एक बादशहाच्या मालकीची होती. यापासून मिळणारा महसूल केंद्रीय कोषात जमा होत असे. दुसऱ्या प्रकारची जमीन जहागीर या प्रकारात मोडत होती. सम्राटाचा या जमिनीवर थेट अधिकार पोहोचत नसल्याने या जमिनीतून ठरावीक हिस्साच महसुलात जमा होत असे. अकबराने या जमीन महसूल पद्धतीमध्ये बदल करून राज्याचा महसूल वाढविण्याचा विचार केला. ही जबाबदारी त्याने राजा तोरडमलवरती सोपविली. इ.स.१५७३ मध्ये गुजरात मुघल साम्राज्यात आल्यावर तेथील महसूल व्यवस्थेची जबाबदारी तोरडमलवर सोपविण्यात आली होती ती त्याने यशस्वीरित्या पार पाडली. अकबराने इ.स.१५८२ मध्ये तोरडमलची साम्राज्याच्या दिवाणपदी नियुक्ती केली.

### तोरडमलची रयतवारी पद्धत

राजा तोरडमलने बांबूच्या साहाय्याने जमिनीच्या मोजणीची पद्धत अवलंबिली. जमिनीचे उत्पादन क्षमतेनुसार चार प्रकार करण्यात आले. ते याप्रमाणे –

१. **पोलज :** दरवर्षी लागवडीखाली येणारी उत्कृष्ट जमीन.

२. **परौती :** मध्यम उत्पन्न देणारी जमीन.

३. **चाचर :** एकदा उत्पन्न घेतल्यावर तीन-चार वर्षे पडीक ठेवावी लागणारी निकृष्ट जमीन.

४. **बंजर :** उत्पादनासाठी पाच वर्षांहून जास्त काळ पाडून ठेवावी लागणारी ओसाड जमीन.





तोरडमलने जमीन महसूल दराचा तपशीलवार अभ्यास केला व त्यानुसार त्याने सरासरी काढण्याची पद्धती अवलंबिली. यासाठी १० वर्षांचा कालखंड घेण्यात येऊन सरासरी काढली जाई व त्यावर १/३ कर जमीन महसूल म्हणून आकारला जाई. जमीन महसूल धान्याच्या स्वरूपात असे. प्रसंगी तो रोखीने भरण्याचीही मुभा होती. महसुली अधिकाऱ्यांना सरासरीच्या १/३ एवढाच कर घ्यावा लागे. शेतकऱ्यांनाही आपणास किती कर भरावयाचा आहे याची निश्चित माहिती मिळाली. सरकारी अधिकाऱ्यांचे भय त्यांना राहिले नाही. शेतकरी वर्ग समाधानी झाला. सरकारी उत्पन्नात वाढ झाली. यास तोरडमलची रयतवारी पद्धत अथवा **'तोरडमलचा बंदोबस्त'** असे म्हणतात.

शेती उत्पादनात वाढ व्हावी, महसुली उत्पन्न वाढावे यासाठी शासन पातळीवरून अनेक उपाययोजना आखल्या जात. आवश्यकतेनुसार शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जाई. नैसर्गिक संकटप्रसंगी पिकांस नुकसान पोहोचले तर त्यामध्ये शेतकऱ्यांचा विचार केला जाई. सारा वसुली अधिकाऱ्यांना महसूलविषयक माहिती आपल्या दप्तरी ठेवावी लागे. आपल्या वरिष्ठांना त्याबाबतची माहिती सादर करावी लागे. शहाजहान व औरंगजेबाच्या कालखंडामध्ये जमीन महसुलामध्ये वाढ करण्यात आली व अकबर काळातील १/३ असणारा जमीन महसूल आता १/२ करण्यात आला. राज्याच्या महसुली उत्पन्नात वाढ झाली परंतु प्रजा कराच्या असह्य बोजाने दबली गेली. याबाबत **बर्नियर** म्हणतो की, 'शहाजहान निरंकुश शासक असल्याने शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत हलाखीची झाली.

### मुघलांचे लष्करी प्रशासन

सम्राट अकबराच्या सैन्यामध्ये घोडदळ, पायदळ, हत्तीदळ, तोफखाना इत्यादी विभाग होते. इतिहासकारांच्या मतानुसार अकबराचे स्थायी सैन्य ३ लाखांच्या दरम्यान होते. अकबराच्या सुरुवातीच्या कालखंडात सैन्यामध्ये मंगोल, तुर्क, उझबेग, इराणी, अफगाण इत्यादी सैनिकांचा भरणा होता. मात्र पुढील काळात अकबराने भारतीयांना मोठ्या प्रमाणात सैन्यात सामावून घेतले. हुमायून काळात सैन्यामध्ये जो विस्कळीतपणा आला होता तो दूर करून अकबराने सैन्यात शिस्त निर्माण केली. सैन्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी 'मनसबदारी पद्धतीचा' अवलंब करण्यात आला. यामध्ये १० सैनिकांच्या गटप्रमुखापासून ते १० हजार सैनिकांच्या गट- प्रमुखापर्यंतच्या श्रेणी निर्माण करण्यात आल्या. एकूण ३३ प्रकारच्या श्रेणी होत्या. मनसबदारांमध्ये जाट मनसबदारी व सवार मनसबदारी हे दोन महत्त्वपूर्ण प्रकार होते. ब्लॉकमन यांच्या मते, जाट मनसबदारीमध्ये किती सैन्य बाळगावे ही संख्या निर्देशित होत होती तर सवार मनसबदारीमध्ये मनसबदाराने प्रत्यक्ष किती घोडेस्वार बाळगले ही संख्या निर्देशित केली होती.

१. **मनसबदारांचे लष्कर :** सम्राट अकबराने या पद्धतीचा अवलंब केला. मनसब याचा अर्थ स्थान असा होतो. १० सैनिकांपासून ते १० हजारपर्यंतची मनसब मिळत होती. या सैन्याच्या खर्चासाठी सरकारकडून त्यांना रकमा देण्यात येत होत्या. मनसबदारांना सैन्यभरतीचे अधिकार देण्यात आले होते. सैनिकांना वेतन देण्याचे कामही त्यांच्याकडेच होते. यामुळे सैनिक

Scanned with CamScanner

मनसबदारनिष्ठ राहत. या व्यवस्थेमध्ये काही दोष असले तरी मुघल काळात मनसबदारांनी अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. पदोन्नती व पदच्युतीचे अधिकार सम्राटाने आपल्या हाती ठेवून मनसबदारांच्या लष्कराच्याद्वारे आपले साम्राज्य उभारले.

**२. दाखिली सेना :** राज्यातील अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम या सेनेला करावे लागे. चोर, डाकू, लुटेरे यांच्यापासून प्रजेचे रक्षण करणे हे दाखिली सेनेचे काम होय.

**३. अहिदी सेना :** या सेनेमध्ये उच्च कुलातील लोकांचा समावेश असे. त्यांना मोठे वेतन मिळत असे. अहिदी सेनेतील निष्ठावान व चपळ सैनिकांचा समावेश सम्राटाचे अंगरक्षक म्हणून केला जाई.

**४. स्थायी सेना :** स्थायी सेनेचे नेतृत्व सम्राटाकडे असे. यामध्ये घोडदळ, पायदळ, हत्तीदळ यांचा समावेश असून ही सेना राजधानीच्या ठिकाणी केंद्रित झालेली असे. अकबराचे स्थायी सैन्य ३ लाखाच्या जवळपास होते. अकबराने स्थायी सेनेबरोबरच मनसबदारांचे लष्कर व मांडलिक राजांचे लष्कर यावर भर दिला होता.

**५. मांडलिक राजांचे लष्कर :** अनेक राजांनी अकबराचे मांडलिकत्व स्वीकारले होते. त्यांची राज्ये अकबराने खालसा केली नाहीत. मात्र या राजांना अकबरास ठरावीक महसूल द्यावा लागे व वेळप्रसंगी आपले लष्कर घेऊन सम्राटाच्या मदतीस जावे लागे. जयपूरचा राजा भारमल, जोधपूरचा राजा चंद्रसेन, बिकानेर सत्ताधीश राजकल्याणमल, जेसलमेरचा हरराय इत्यादी सत्ताधिशांनी सम्राट अकबराचे मांडलिकत्व स्वीकारले होते.

वरील लष्करी विभागाच्या माध्यमातून अकबराने आपले विस्तीर्ण साम्राज्य उभे केले. अकबराच्या लष्कराबाबत **व्ही.ए.स्मिथ** म्हणतो की, 'प्राचीन काळातील मौर्य सम्राटाप्रमाणे सरकारच्या खर्चाने अकबराने फार मोठे सैन्य जवळ बाळगले असावे असे दिसत नाही. त्यांच्या सैन्यात मांडलिक राजांची फौज व स्थानिक अधिकाऱ्यांनी उभारलेले सैन्य यांचाच अधिक भरणा होता'.

## लष्कराचे प्रमुख विभाग

**१. घोडदळ :** घोडदळातील सैनिकांचा दर्जा हा पायदळातील सैनिकांपेक्षा वरचा होता. त्यांचे वेतनही पायदळातील सैनिकांपेक्षा जादा होते. घोडेस्वाराकडे जातिवंत घोडा असावा त्याचबरोबर ढाल, तलवार, भाला इत्यादी साहित्य असावे अशी सरकारची अपेक्षा असे. घोड्यांना डाग देण्याची प्रथा होती. सरकारी व मनसबदारी अशा दोन प्रकारचे डाग दिले जात.

**२. पायदळ :** घोडदळाप्रमाणेच पायदळ हाही महत्त्वपूर्ण विभाग होता. पायदळात लढाऊ व बिनलढाऊ असे दोन प्रकार होते. लष्करी मोहिमांमध्ये घोडदळाबरोबर पायदळाचाही समावेश होत असे. पायदळ सैनिकांकडे ढाल, तलवार, भाला, दांडपट्टा इत्यादी साहित्य असे.

**३. हत्तीदळ :** लष्करी मोहिमेच्या प्रसंगी मोहीमप्रमुख हत्तीवर बसून लष्कराचे नेतृत्व करत असे. पायदळाची अभेद्य फळी तोडण्यासाठी तसेच शत्रूचा वाडा, गडकोटाचे दरवाजे फोडण्यासाठी हत्तींचा उपयोग केला जाई. मिरवणुकीसाठीही हत्तींचा उपयोग केला जाई.



**४. तोफखाना :** तोफा या संहारक शस्त्राचा वापर युद्धाच्या वेळी केला जात असे. लहान तोफांपासून ते अवजड तोफांपर्यंतची अस्त्रे लष्करात असत. किल्ल्याचे तट ढासळण्यासाठीही तोफा वापरल्या जात. या विभागामध्ये प्रामुख्याने विदेशी लोकांचा समावेश अधिक होता.

**५. नौदल :** सागरी किनारपट्टीच्या संरक्षणासाठी, व्यापाराच्या रक्षणासाठी आरमाराची आवश्यकता होती. अकबराचे नौदल फारसे प्रबळ नव्हते. परंतु गुजरात विजयामुळे अकबराच्या साम्राज्याला सागरी किनारपट्टी लाभली व नौदलाकडे लक्ष देणे गरजेचे ठरले. नौदल सैनिकांमध्ये प्रामुख्याने किनारपट्टी प्रदेशातील लोकांचा भरणा असे. तर आरमारात गुराब, गलबत, तरांडी, माचवा इत्यादी प्रकारची जहाजे असत.

## सम्राट अकबराचा नवरत्नदरबार

सम्राट अकबर विद्याप्रेमी व कलाप्रेमी होता. त्याने आपल्या दरबारात अनेक बुद्धिवान व्यक्तींना व गुणी कलाकारांना आश्रय दिला होता. अब्दुल रहीम खानखाना, अबुल फजल, शेख फैजी, तानसेन, राजा तोरडमल, राजा बिरबल, राजा मानसिंह, मुल्ला-दो-प्याजा, हकीम हुमाम या ९ दिग्गजांना सम्राट अकबराचा 'नवरत्न दरबार' असे म्हणतात.

**१. अब्दुल रहीम खानखाना :** अकबराचा पालक बैरामखान याचा हा पुत्र होय. लहानपणीच त्यास अरबी, फारशी, हिंदी व संस्कृतचे शिक्षण मिळाले. सैनिकी शिक्षणातही त्याने प्रावीण्य मिळवले. बैरामखानाच्या मृत्यूनंतर सम्राट अकबराने त्याच्या पुत्रास राजाश्रय दिला. अब्दुल रहीम हा उत्कृष्ट लेखक, कवी व कर्तबगार सेनापती होता. त्याने तुर्कीतील बाबरनाम्याचे फारसीत भाषांतर केले. नायिकाभेद, मदनाष्क यासारखे ग्रंथ लिहिले. नीतिपर अनेक दोहे लिहिले. अकबराने सोपविलेली अहमदनगर व सिंधवरील स्वारी त्याने यशस्वी केली. अकबराने त्याच्या कामगिरीचा गौरव म्हणून त्यास 'खानखाना' ही पदवी देऊ केली.

**२. अबुल फजल :** इ.स.१५५१ मध्ये शेख मुबारक या विद्वानाच्या पोटी अबुल फजलचा जन्म झाला. त्याच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था करण्यात आली होती. लहानपणापासूनच त्याच्यावर सुफी पंथाचा प्रभाव पडल्यामुळे तो सहिष्णू वृत्तीचा बनला. अकबराने त्यास ५ हजारची मनसब दिली होती. साहित्यिक व धार्मिक वादविवादात त्याच्याबरोबर दोन हात करण्यास कोणीही पुढे येत नसे. विद्वत्ता आणि संभाषण चातुर्य याबाबत तो प्रख्यात होता. सम्राट अकबराच्या कारकिर्दीची माहिती देणारे 'अकबरनामा' व 'ऐन-ए-अकबरी' हे दोन ग्रंथ म्हणजे अबुल फजलच्या अपार परिश्रम व सखोल अभ्यासाचे द्योतक होय. अबुल फजलच्या कार्यामुळे तो अकबराचा आवडता बनला. दरबारातील त्याच्या मान, प्रतिष्ठेमुळे राजपुत्र सलीम दुखावला गेला होता. वारसा युद्धामध्ये अबुल फजलचा आपणास मोठा अडथळा निर्माण होईल असे सलीमला वाटू लागले आणि यामधूनच सलीमचा मित्र ओर्च्छाचा राजा वीरसिंहदेव बुंदेला यांच्या लोकांनी १२ ऑगस्ट, १६०२ रोजी अबुल फजलला ठार केले. यामुळे सम्राट अकबराला अतिव दुःख झाले.

Scanned with CamScanner

**३. शेख फैजी (अबुल फैजी ) :** हा अबुल फजलचा मोठा भाऊ होय. त्याने अनेक ग्रंथ लिहिले आहेत. तो कवीही होता. कवी म्हणूनच त्याचा अकबराच्या दरबारी प्रवेश झाला होता. अबुल फजलप्रमाणेच त्याच्यावरही सुफी पंथाचा प्रभाव होता. या दोघाही बंधूंच्या उदारमतवादी विचारांचा अकबराच्या धार्मिक धोरणावर प्रभाव पडला. लीलावती, नल दमयंती व महाभारत या ग्रंथांचे अबुल फैजीने फारसीत भाषांतर केले. तो इतिहास तत्त्वज्ञान, वैद्यक, गणित इत्यादी विषयांत पारंगत होता. अकबराचा तो जवळचा सहकारी होता. अकबराच्या ग्रंथ संपादक मंडळाचा तो अध्यक्ष होता.

**४. तानसेन :** याच्या बालपणाविषयी निश्चित माहिती मिळत नाही. मात्र तानसेनचा जन्म ग्वाल्हेरजवळील वैहंद येथे झाला असे मानले जाते. वृंदावनच्या स्वामी हरिदास यांच्याकडे तानसेनने १२ वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. ग्वाल्हेरचा राजा विक्रमसिंह तोमर यांनी त्याचे गायन ऐकून त्यास 'तानसेन' ही पदवी बहाल केली. तानसेनचे मूळ नाव रामननू पांडे असे होते. तानसेनने रीवाचा राजा नरेश रामचंद्र यांचे दरबारी गायकाचे काम केले. तानसेनची ख्याती सम्राट अकबराच्या कानावर गेली. त्याला सन्मानाने अकबराच्या दरबारी बोलाविले गेले. इ.स.१५६२ पासून तानसेन अकबराच्या दरबारी काम करू लागला. तानसेनने संगीतामधील १० ते १२ राग शोधून काढले.

**५. राजा तोरडमल :** अवध प्रांतात जन्मास आलेल्या राजा तोरडमलने सुरुवातीच्या कालखंडात शेरशहाकडे महसुली अधिकारी म्हणून काम केले. इ.स. १५७७ मध्ये राजा तोरडमल सम्राट अकबराच्या दरबारी आला. अकबराच्या महसूलविषयक सुधारणा राबविण्यात राजा तोरडमलचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. अकबराने इ.स. १५८२ मध्ये त्याची दिवाणपदी नियुक्ती केली. तोरडमलने भूमी सुधारणा करून, महसूलविषयक धोरणात सुधारणा करून राज्याची आर्थिक स्थिती मजबूत केली. तोरडमल जसा प्रशासक होता तसा सेनापतीही होता. तो अनेक युद्धमोहिमांत सहभागी झाला. सम्राट अकबराने काश्मीर विजयासाठी राजा मानसिंहाबरोबर राजा तोरडमलची नियुक्ती केली होती. राजा तोरडमलबद्दल **अबुल फजल** म्हणतो की, 'नेकी, सरळपणा, मर्दानगी, व्यवहारज्ञान, कारभारातील कौशल्य या गुणांत अखिल हिंदुस्थानात त्याच्या तोडीचा दुसरा पुरुष नव्हता'.

**६. राजा बिरबल :** इ.स. १५२८ मध्ये बिरबलाचा जन्म काल्पी या ठिकाणी झाला. महेशदास हे त्याचे मूळ नाव होय. हजरजबाबी म्हणून बिरबलाची ख्याती होती. विनोद, किस्से याबाबत बिरबल प्रसिद्ध आहे. त्याच्या या गुणांमुळे अकबर बिरबलावर खुश झाला व त्यास नवरत्न दरबारात स्थान दिले. पुढे अकबराने बिरबलास सुभेदारीची वस्त्रे, दोन हजारची मनसब व राजा हा किताब देऊ केला. अकबराच्या दिने-इलाही धर्माचा स्वीकार बिरबलाने केला. तो. इ.स. १५८८ मध्ये वायव्य सीमेवरील युद्धात मारला गेला. बिरबलाच्या मृत्यूमुळे अकबरास अतिव दुःख झाल्याचे इतिहासकार बदायुनीने नमूद केले आहे.

**७. राजा मानसिंह :** जयपूरचा शासक भारमल याचा मानसिंह हा नातू होय. अकबराचा भारमालच्या राजकन्येशी विवाह झाल्यानंतर राजा मानसिंहास अकबराने आपल्या सेवेत समाविष्ट



केले. तो शेवटपर्यंत अकबराशी एकनिष्ठ राहिला. अकबराच्या साम्राज्याविस्तारात त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजाविली आहे. मेवाडचे राज्य जिंकण्यासाठी इ.स. १५७६ मध्ये राजा मानसिंहाच्या नेतृत्वाखाली फौज पाठविली होती. इ.स. १८ जून, १५७६ रोजी झालेल्या हळदीघाटच्या युद्धात मानसिंहाने महाराणा प्रतापचा पराभव केला होता. त्याचबरोबर काबूल, काश्मीर, ओरिसा हे प्रांत जिंकण्यासाठीही त्याने युद्धमोहिमा काढल्या होत्या. बंगाल व काबूलच्या राज्यपालपदाची जबाबदारीही राजा मानसिंहाने काही काळ केली होती.

**८. मुल्ला-दो-प्याजा :** याची हजरजबाबी म्हणून ख्याती होती. तो अतिशय कुशाग्र बुद्धीचा होता. यामुळे त्यास अकबराने आपल्या नवरत्न दरबारात स्थान दिले होते. तो मूळचा अरबस्थानी असून अबुल हसन हे त्याचे मूळ नाव होय. परंतु मांसाहारात त्यास कांदा प्रिय असल्याने त्यास मुल्ला-दो-प्याजा हे पदनाम मिळाले.

**९. हकीम हुमाम :** सम्राट अकबराच्या दरबारातील हकीम हुमाम हे एक रत्न होय. त्याच्याकडे अकबराच्या रसोई घराची जबाबदारी होती. तो रसोई घराचा मुख्य अधिकारी होय. काही इतिहासकारांनी हकीम हुमाम ऐवजी इतिहासकार बदायुनी यास अकबराच्या नवरत्न दरबारात स्थान दिले आहे.

## सम्राट अकबराचे मूल्यमापन

मुघल कालखंडातील सर्व शासकांमध्ये सम्राट अकबराचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. अनेक इतिहासकारांनी सम्राट अकबराची त्याच्या समकालीन इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ, फ्रान्सचा सम्राट चौथा हेन्री यासारख्या महान राज्यकर्त्यांबरोबर तुलना केली आहे. अक्बर हा सुशिक्षित नसला तरी त्याची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती प्रचंड होती. त्याने साम्राज्यवाढ, प्रशासन याकडे जसे लक्ष दिले तसे संगीत, कला, साहित्य याकडेही लक्ष दिले. सम्राट अकबराने ४९ वर्षे ८ महिने राज्यकारभार पाहिला. मुघल सत्तेला त्याच्याच काळात स्थिरता लाभली. इ. स. १५ ऑक्टोबर, १६०५ रोजी अकबराचा मृत्यू झाला.

ब्रिटिश इतिहासकार **व्हिसेंट स्मिथ** म्हणतो की, 'अकबरात जन्मतःच नेतृत्वाचे गुण होते. त्यामुळे भारताच्या इतिहासातील एक थोर सम्राट म्हणून त्याचा गौरव करावा लागेल'. **स्टेनले लेनपूल** हा प्रसिद्ध इतिहासकार सम्राट अकबराचे मूल्यमापन करताना म्हणतो की, 'तो भारतातील सर्वश्रेष्ठ शासक होता. तो साम्राज्याचा खरा संस्थापक व संघटनकर्ता होता. तो मुघल साम्राज्याच्या सुवर्णयुगाचे प्रतीक होता. हिंदू सरदारांना साम्राज्यात समाविष्ट करणे ही अकबराच्या शासन- काळातील सर्वांत महत्त्वपूर्ण घटना होती. साम्राज्यविस्तार हिंदू राजांच्या मदतीने केला व त्याबरोबरच सुव्यवस्थित शासनाची स्थापना केली. भारतीय शासनव्यवस्थेत ही गोष्ट उल्लेखनीय व नवीन होती. अकबराची श्रेष्ठता यातच म्हटली पाहिजे, की त्याने डगमगणाऱ्या साम्राज्याला स्थिरता आणून दिली व स्थायी स्वरूपाची शासनव्यवस्था निर्माण केली'.

सम्राट अकबराचा आधुनिक भारताचा पहिला राष्ट्रनिर्माता म्हणून गौरव केला आहे. तर काहींना हे मत मान्य नाही. डॉ. के. एम. पण्णीकर 'A Survey of Indian History' या

Scanned with CamScanner

ग्रंथात अकबराविषयी म्हणतात की, 'त्याने आपल्या मागून येणाऱ्या शासकांना तीन गोष्टींचा वारसा दिला. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे राष्ट्रराज्याची निर्मिती, दुसरी हिंदूंशी सामोपचाराचे धोरण, तिसरी आधुनिक भारताचे एकीकरण होय'. अकबराच्या गुणदोषांवरही इतिहासकारांनी प्रकाश टाकला आहे. 'Akbar the Great Mughal' या ग्रंथात व्ही.ए.स्मिथ म्हणतात की, 'चारित्र्य व नीतिमत्ता हे निकष लावले तर अकबर श्रेष्ठ ठरत नाही. अकबराच्या जनानखान्याबद्दल व मिनाबाजाराबद्दल त्यास दोषी धरण्यात आले आहे.' व्ही.ए.स्मिथ यांचे मत खोडून काढताना **डॉ. ईश्वरीप्रसाद** आपल्या 'A short History of Muslim Rule in India' या ग्रंथात लिहितात की, 'अकबराच्या आयुष्यातील काही घटनांचा उल्लेख करून स्मिथने अकबरास वाईट रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांच्या अनेक समकालीन युरोपियन राज्यकर्त्यांपेक्षा अकबर थोर होता हे सिद्ध करता येईल'. अकबराने हिंदू धर्मीयांना बरोबर घेऊन संघटित भारत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक सहिष्णुतेचे धोरण स्वीकारले. सामाजिक ऐक्यनिर्मितीचा प्रयत्न केला. केवळ राजकीय दृष्टिकोणातूनच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बाबतीत राष्ट्रीय वृत्ती वाढीस लावण्याचा प्रयत्न केला.

**१. अकबर थोर साम्राज्यनिर्माता :** सम्राट अकबराने प्रचंड साम्राज्यविस्तार करून दक्षिणेचा काही भाग वगळता संपूर्ण भारत आपल्या नियंत्रणाखाली आणला. पश्चिमेस अरबी समुद्र, पूर्वेस बंगालचा उपसागर, दक्षिणेस अहमदनगर व ईशान्येस आसाम अशा अकबराच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. सर्व देश एकछत्री अमलाखाली आणणारा अकबर हा पहिला मुघल सम्राट होय. मनसबदार पद्धतीचा त्याने अवलंब केला. इतिहासकार **व्ही. ए. स्मिथ** म्हणतात की, '१६ व्या शतकाच्या अखेरच्या चरणात अकबराचे साम्राज्य जगात सर्वांत बलवान होते व तो सार्वभौम बादशहा पृथ्वीतलावरील सर्वांत श्रीमंत राज्यकर्ता होता'. **एडवर्डस व गॅरेट** अकबराच्या साम्राज्याबाबत म्हणतात की, 'जवळजवळ ५० वर्षांच्या शासन काळात अकबराने अशा साम्राज्याची स्थापना केली की, जे अतिशय बलसंपन्न साम्राज्याबरोबर स्पर्धा करू शकेल. त्यामुळे पुढील १०० वर्षांत भारतात या साम्राज्याला कोणी आव्हान दिले नाही'. इतिहासकार **ब्लोचमन** म्हणतो की, 'प्रसंगावशात अबुल फझलच्या लेखणीतून अकबराची स्तुती उतरते नाही असे नाही पण ती अगदी न्याय्य असून तिला तो सम्राट निःसंशय पात्र होता'. **लेनपुल** म्हणतो की, 'Akbar was the noblest king that ever ruled India' हिंदू-मुस्लीम यांना एकत्र आणण्याच्या कामगिरीबाबत **डॉ. आर. एस. शर्मा** म्हणतात की, 'Out of all the rulers of India, Akbar enjoyed a unique position, because a part things he did, he succeeded to a great extent in bringing the two great communities of India the Hindus and the Muslims closer to each other'.

**२. थोर मुत्सद्दी :** हुमायूनच्या मृत्यूनंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये मोठ्या कौशल्याने व मुत्सद्देगिरीने यावर मात करत अकबराने यश मिळविले. राजकीयदृष्ट्या तो कमालीचा जागृत होता. साम्राज्यवाढीसाठी त्याने रजपुतांचे साहाय्य मिळविले. जयपूर, बिकानेर, जैसलमेल या रजपूत सत्तांशी त्याने नातेसंबंध निर्माण केले. अकबराच्या साम्राज्यविस्तारासाठी अनेक रजपूत राजांनी मोलाचे योगदान दिले. इ.स. १५७६ मध्ये मेवाडविरुद्ध झालेल्या हळदीघाटच्या लढाईत



राणा प्रतापच्या विरोधात बहुतेक सर्व राजे अकबराच्या बाजूने लढले. यामध्ये अकबराची मुत्सद्देगिरी दिसते. अकबराने मोठ्या कल्पकतेने साम्राज्यविस्तार केला. **मॅलसेन** हा इतिहासकार म्हणतो की, 'ज्या काळात अकबराने कार्य केले त्याचा विचार करता अकबराची कर्तबगारी निश्चितच गौरवास्पद आहे. शांतता, सहिष्णुता व समन्वय या धोरणांचा पुरस्कार करून त्याने भारतीय जनतेच्या कल्याणासाठी अविश्रांत परिश्रम केले. सत्याचा शोध व ईश्वरचिंतन या क्षेत्रांत अभिनव उपक्रम राबविणारा तो एक महान कल्पक राजा होता'.

**३. कुशल सेनापती :** अकबर हा हाडाचा सैनिक होता. आपल्या लष्करावर त्याचे बारकाईने लक्ष असे. लष्करासाठीचे सामान-सुमान, त्यांची हत्यारे, त्यांच्या अडीअडचणी याकडे तो बारीक लक्ष देत असे. यशस्वी सैन्य अधिकाऱ्यांचा तो सत्कार करत असे. त्याने मनसबदारीच्या माध्यमातून आपले प्रचंड लष्कर उभारले. साम्राज्यवाढीसाठी अकबराने अनेक लढाया केल्या. त्या प्रत्येक लढाईत त्याने यश मिळवले. **अकबर स्वतः म्हणतो की,** 'शत्रूवर चढाई करण्याची तयारी राजाने नेहमी ठेवली पाहिजे, नाहीतर आजूबाजूचे लोक त्याच्यावर चढाई करतात. राजाने सतत विजय मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. राजाने प्रत्यक्ष लढाईचा अनुभव घेऊन आपले सैन्य नेहमी सुसज्ज ठेवले पाहिजे नाहीतर आळसात आणि चैनीत राहण्याची सवय सैन्याला लागते'. अकबराच्या भारदस्त शरीरयष्टीबद्दल ख्रिश्चन धर्मप्रसारक **फादर मॉन्सरेट** म्हणतो की, 'अकबराला पाहिल्याबरोबर तो राजा आहे हे ओळखता येत असे. तो प्रचंड देहयष्टीचा बलाढ्य पुरुष होता. त्याचे खांदे व छाती रुंद होती'. **जहांगिर** 'तुझक-ए-जहांगिरी या ग्रंथात अकबराबद्दल म्हणतो, 'अकबर मजबूत देहयष्टीचा आणि बलाढ्य पुरुष होता. त्याची छाती रुंद असून, हात वाजवीपेक्षा जास्त लांब होते. त्याचा आवाजही मोठा असून त्यात एक प्रकारचा भारदस्तपणा होता. त्याच्या बोलण्यावरून तो एक असामान्य पुरुष वाटत असे'.

**४. श्रेष्ठ प्रशासक :** अकबराने जास्तीतजास्त कल्याणकारी व लोकाभिमुख शासनव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अकबराच्या प्रशासनाचे पाच विभाग होते. त्यामध्ये केंद्रीय मध्यवर्ती प्रशासन, प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन व ग्राम प्रशासन असे विभाग होते. त्या प्रशासनाची कार्यपद्धती पर्शियन होती. प्रांतीय शासन अरबी पद्धतीचे होते आणि स्थानिक प्रशासन हे भारतीय होते. अकबराने प्रशासकीय व्यवहार लेखी ठेवले होते .सर्व धर्मीयांना प्रशासन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण स्थान होते. मुलकी व लष्करी अशी दोन्ही कामे अधिकाऱ्यांना पार पाडावी लागत. राजा मानसिंह, राजा तोरडमल, राजा भगवानदास यांनी या दोन्ही जबाबदाऱ्या अगदी समर्थपणे सांभाळल्या. सम्राट अकबराच्या प्रशासन व्यवस्थेबद्दल **लेनपुल** म्हणतो की, 'अकबर हा भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्कृष्ट शासकांपैकी एक होता. वास्तविक तो मुघल साम्राज्याचा संस्थापक आणि संघटनकर्ता होता. तो मुघल साम्राज्याच्या सुवर्णयुगाचा प्रतीक होता'.

**५. धर्मसहिष्णू सम्राट :** अकबराने सर्व धर्मांमधील उदात्त तत्त्वे एकत्र करून दिने-इ-लाही या धर्माची स्थापना केली. सर्वधर्मीयांमध्ये विचारविनिमय व्हावा यासाठी 'इबादतखाना' निर्माण केला. अकबराने हिंदूंवरचे जाचक निर्बंध उठविले. इ.स.१५६३ मध्ये यात्रेकरूवरील

Scanned with CamScanner

डागत असता यात शेरशहा जखमी झाला. किल्ला मिळविण्यात तो यशस्वी झाला पण यातच त्याचा मृत्यू झाला.

## शेरशहाचे प्रशासन

शेरशहाचे साम्राज्य हिमालय ते विंध्य व वायव्य सीमा ते बंगाल असे विस्तारले होते. आपल्या पाच वर्षांच्या अल्पकालखंडात त्याने अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या. त्याची शासनव्यवस्था अल्लाउद्दीन खिलजीच्या शासनव्यवस्थेवर आधारित असली तरी जुन्या संस्थांना त्याने नवे रूप दिले, त्यात नावीन्य निर्माण केले. **डॉ. कानुनगो** च्या मते, 'शेरशहा अकबरापेक्षाही महान रचनात्मक प्रतिभासंपन्न शासनकर्ता होय'. **डॉ.डी.सी.सरकार** म्हणतात की, 'Sher Shah was not only a great conquerer but he also showed greater qualitions as an administrator'. (Modern Indian History Vol-I) शेरशहाबद्दल **इरॅस्कीन** हा इतिहासकार म्हणतो की, 'शेरशहा हा प्रथम प्रशासक होता व त्याने मिळविलेले विजय हे दुय्यम स्वरूपाचे होते'.

शेरशहाचे प्रशासक म्हणून श्रेष्ठत्व नाकारणाऱ्या इतिहासकारांमध्ये डॉ. ए.एल.श्रीवास्तव, डॉ. आर. पी. त्रिपाठी व डॉ. पी. इराण यांचा समावेश होतो. **डॉ. श्रीवास्तव म्हणतात** की, 'शेरशहाची संपूर्ण राज्यव्यवस्था जुनीच होती. त्याच्या लष्करी सुधारणा अल्लाउद्दीन खिलजीच्या असून जमीन महसूलविषयक सुधारणा नवीन नव्हत्या परंतु जुन्याच राज्यव्यवस्थेत त्याने नवीन प्राण ओतला व लोककल्याणासाठी राज्ययंत्रणा वापरली'. **डॉ.त्रिपाठी व डॉ.इराण यांचे मते**, 'शेरशहाच्या राज्यव्यवस्थेविषयी उगीचच गाजावाजा करण्यात आला आहे. वास्तविक पाहता शेरशहाने नवीन असे काहीच केले नाही. अल्लाउद्दीन खिलजीच्या राज्यकारभाराच्या धर्तीवर त्याची राज्यव्यवस्था आधारलेली होती'.

अब्बासखान शेरवाणी याने आपल्या 'तारीख-ए-शेरशाही' या ग्रंथामध्ये शेरशहाच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती दिली आहे. शेरशहाच्या शासनव्यवस्थेचे मुलकी प्रशासन व लष्करी प्रशासन हे दोन प्रमुख भाग होत.

## शेरशहाची मुलकी प्रशासन व्यवस्था (Civil Administration)

मुलकी प्रशासनाचे प्रमुख विभाग

१. केंद्रीय प्रशासन

२. प्रांतीय प्रशासन

३. सरकार किंवा जिल्हा प्रशासन

४. परगणा किंवा तालुका प्रशासन

५. खेड्यांची शासनव्यवस्था.

### १. केंद्रीय प्रशासन

**१. सम्राटाचे स्थान :** सम्राट शेरशहा हा शासन यंत्रणेचा प्रमुख होता. निरंकुश सत्ता त्याच्या हाती एकवटली होती. मुलकी व लष्करी प्रशासनाचे अधिकार त्याच्या हाती होते.



सम्राटावर कोणत्याही प्रकारची बंधने नव्हती. असे असले तरी शेरशहा जुलमी सत्ताधीश नव्हता. त्याने जनकल्याणाकडे लक्ष दिले. युद्ध मोहिमांत सतत व्यग्र असतानाही त्याने प्रशासनाकडे जातीनिशी लक्ष दिले. शेरशहाच्या केंद्रीय प्रशासनाची व्यवस्था पुढील सहा विभागांत होती.

**२. दिवाण-ए-वझारत :** या विभागाचा प्रमुख वजीर होय. सम्राटानंतरचे हे महत्त्वपूर्ण खाते होय. राज्याचे उत्पन्न व खर्च यांचा हिशेब ठेवण्याचे काम म्हणजेच वजिरास अर्थमंत्र्याची भूमिका पार पाडावी लागे. त्याचबरोबर खात्यावर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे इत्यादी कामे वजिराला करावी लागत असत. शेरशहा स्वतः अर्थखात्यामध्ये लक्ष घालत असे.

**३. दिवाण-ए-आरिज :** दिवाण-ए-आरिज म्हणजे सैन्य विभाग होय. या विभागाचा प्रमुख सेनापती यास आरिज-ए-मुमालिक असे म्हणत. लष्कर भरती, सैन्य संघटन, त्यांचे प्रशिक्षण, वेतन व युद्धमोहिमा इत्यादी कामे या विभागास करावी लागत. शेरशहा स्वतः सेनापती व रणनितीज्ञ असल्याने आपले लष्कर त्याने अद्ययावत ठेवले होते. सैन्यभरती वेळी तो स्वतः हजर राहत असे. सैनिकांच्या सोई-सुविधांकडे तो काळजीपूर्वक लक्ष देई. सेनापतीस युद्ध मोहिमांसाठी लागणारी रसद व शस्त्रपुरवठा करण्याची कामगिरी बजावावी लागे.

**४. दिवाण-ए-रसालत :** या विभागास परराष्ट्र खात्याचे काम करावे लागत असे. या विभागास शेजारील राज्यांच्या राजदूतांशी संपर्क ठेवावा लागत असे. परराज्यातील राजदूत राज्यात आल्यास त्याची व्यवस्था ठेवणे. परराज्याच्या संबंधाबाबत निर्णय घेणे. आपले राजदूत इतर राज्यांत पाठविणे आणि परराज्यांशी पत्रव्यवहार ठेवणे इत्यादी कामे परराष्ट्रमंत्रालयास करावी लागत.

**५. दिवाण-ए-काझा :** दिवाण-ए-काझा म्हणजे शेरशहाचे केंद्र न्यायालय होय. त्याच्या प्रमुखास दिवाण-ए-काझी असे म्हणतात. सम्राटानंतरचा तो सर्वोच्च न्यायाधीश होय. राज्याच्या सर्व न्यायव्यवस्थेवर देखरेख करण्याची कामगिरी त्यास करावी लागे. दिवाणी व फौजदारी गुन्ह्यासंबंधी न्यायदानाचे काम पार पाडणे, कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्त्या करणे, जनतेच्या तक्रारी ऐकून घेणे इत्यादी कामे दिवाण-ए-काझी यास करावी लागत.

**६. दिवाण-ए-बरीद :** हा शेरशहाचा गुप्तहेर विभाग होय. या खात्याच्या प्रमुखास दिवाण-ए-बरीद असे म्हणतात. राज्याच्या सर्व विभागांत गुप्तहेर नेमून सर्व प्रकारची माहिती मिळवून ती शेरशहास कळवावी लागे. शहरे, बाजारपेठा, धार्मिक ठिकाणे अशा महत्त्वपूर्ण ठिकाणी गुप्तहेर ठेवले जात. शेजारील राज्याची माहिती मिळविण्यासाठी तेथे गुप्तहेर पाठविले जात व त्यांच्या माध्यमातून तेथील माहिती मिळविली जाई. पोस्ट विभागाचे कामकाजही या विभागाच्या मार्फत चालविले जाई. त्यासाठी घोडेस्वार, सांडणीस्वार यांचा वापर केला जात असे. गुप्तहेर खाते महत्त्वपूर्ण खाते असल्याने शेरशहा स्वतः या खात्यावर लक्ष देत असे.

**७. दिवाण-ए-इन्शा :** सम्राटाने काढलेले आदेश हुकूम प्रांतांच्या अधिकाऱ्यांकडे पाठविण्याचे काम या विभागास करावे लागे. राज्यातील विविध प्रांतांशी संपर्क ठेवणे सर्व

प्रांतांची माहिती राजास पुरविण्याचे काम या विभागास पार पाडावे लागे. सरकारी दप्तर विभाग सांभाळत होता.

**८. सम्राट परिवार संरक्षण विभाग :** सम्राटाच्या परिवाराचे व राजवाड्याचे संरक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या विभागावर होती. राजा व त्याच्या परिवारातील लोकांच्या गरजा पूर्ण करणे व राजवाड्यातील सर्व कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, राजाला आपल्या विभागाची वरचेवर महिती देणे इत्यादी प्रकारची कामे या विभागाला पार पाडावी लागत.

वरील सर्व विभागाचे मंत्री हे राजाच्या आदेशाची अंमलबजावणी करत. ते राजाला सल्ला देण्याचे काम करत असत. शेरशहाचे या सर्व विभागावर बारीक लक्ष होते याबाबत **डॉ. एस. आर. शर्मा** म्हणतात की, 'या सर्व मंत्र्यांवर त्याची सक्त देखरेख होती. प्रत्येकाच्या कामकाजाची तो जातीने पाहणी करत असे'.

## २. प्रांतीय प्रशासन

राज्यकारभाराच्या सोईसाठी राज्याचे अनेक प्रांतांत विभाजन करण्यात आले होते. प्रांताच्या प्रमुखास राज्यपाल म्हटले जाई. प्रांतांत शांतता व सुव्यवस्था ठेवण्याची प्रमुख जबाबदारी त्याला पार पाडावी लागे. राज्यपालाच्या मदतीला अनेक अधिकारी असत. तो आपल्या पदरी सैन्य ठेवत असे. त्याच्या हाती लष्करी सत्ता एकवटली होती. शेरशहाने प्रांतप्रमुखावर नियंत्रण ठेवण्यात यश मिळविले. शेरशहाने लाहोर, माळवा, अजमेर या प्रांतामध्ये लष्करी प्रशासन निर्माण केले होते. मात्र बंगाल, बिहार या प्रांतांचे सरकारमध्ये विभाजन करण्यात आले होते. सर्व प्रांतांची विभागणी सरकारमध्ये करणे शेरशहास अकाली मृत्यूमुळे शक्य झाले नाही.

शेरशहाने आपल्या साम्राज्याची विभागणी प्रांतात केली होती की नाही याबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. याबाबत **डॉ. कानुनगो** म्हणतात की, 'शेरशहाच्या साम्राज्याचे प्रांतात विभाजन करण्यात आले नव्हते. सरकार हा साम्राज्याचा सर्वांत मोठा विभाग असून प्रांत ही अकबराची निर्मिती होय'. तर **डॉ. ए. एल. श्रीवास्तव** यांच्या मतानुसार, शेरशहाने प्रशासनाच्या सोईसाठी आपल्या साम्राज्याची विभागणी प्रांतात केली होती.

## ३. सरकार किंवा जिल्हा प्रशासन

शेरशहाने प्रांताचे विभाजन सरकार (जिल्हा) मध्ये केले होते. त्याने प्रांताचे लहान-लहान विभाग करून त्यास सरकार असे नाव दिले. प्रांतीय सत्ताधिशांच्याकडे होणाऱ्या सत्तेच्या केंद्रीकरणामुळे शेरशहाने जिल्हावार रचनेकडे लक्ष दिले. शेरशहाचे एकूण ४७ सरकार (जिल्हे) असल्याचे दिसते. या जिल्ह्यांचा कारभार पाहण्यासाठी शिकादार-इ-शिकदारान व मुन्सिफ-इ-मुन्सिफान हे प्रमुख अधिकारी होते.

**१. शिकादार-इ-शिकदारान :-** हा जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असून त्याला खालील प्रकारची कामे करावी लागत.

(अ) जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवणे.

(ब) जिल्ह्यातील फौजदारी खटल्यासंबंधी निकाल देणे.



(ब) जिल्ह्यातील फौजदारी खटल्यासंबंधी निकाल देणे.

(क) जिल्ह्यातील परगण्याच्या अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवणे.

(ड) जिल्ह्यातील बंडखोर जमीनदारांवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे बंड मोडून काढणे.

(इ) सम्राटाच्या आदेशानुसार युद्धमोहिमात सहभागी होणे.

**२. मुन्सिफ-इ-मुन्सिफान :** हा जिल्हा पातळीवरील प्रमुख न्यायाधीश होय. जिल्हा पातळीवरील दिवाणी स्वरूपाच्या खटल्याचा निकाल देण्याची कामगिरी त्यास पार पाडावी लागे. तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे. सारा वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे ही कामे पार पाडण्यासाठी त्यांच्या मदतीस पुरेसा कर्मचारी वर्ग दिला जात असे.

## ४. परगणा किंवा तालुका प्रशासन

सरकारचे विभाजन परगण्यात करण्यात येई. जिल्ह्याच्या आकारानुसार त्याचे तालुके केले जात. त्यामुळे जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या ही कमी-जास्त होती. परगण्याचा कारभार पाहण्यासाठी शिकेदार, अमिन, फोतेदार असे तीन प्रमुख अधिकारी होते. तसेच त्यांच्या मदतीसाठी आवश्यक तो कर्मचारी वर्गही नियुक्त केला जात असे. परगण्यात प्रमुख अधिकाऱ्यांची कामे खालीलप्रमाणे –

**१. शिकेदार :** शिकेदार हा तालुका प्रमुख होय. परगण्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्याची प्रमुख जबाबदारी त्याच्यावरती असे. इतर अधिकाऱ्यांच्या सहकार्याने परगण्याचे कामकाज तो पार पाडत असे. त्यास आवश्यक तेवढे सैन्य बाळगण्याचा अधिकार दिला होता.

**२. अमिन किंवा मुन्सिफ :** परगण्यातील न्यायव्यवस्था पाहण्याची प्रमुख जबाबदारी या अधिकाऱ्यास पार पाडावी लागे. त्याचबरोबर महसूलविषयक कामेही तो पाहत असे.

**३. फोतेदार :** हा परगण्याचा खजिनदार होय. शेतसारा व विविध करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिशेब ठेवण्याची कामगिरी तो पाहत असे. परगण्याच्या पत्रव्यवहाराची कामगिरीही त्यास पाहावी लागे. परगण्यामध्ये शेतसारा वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कानुगो असे म्हटले जाई.

## ५. ग्रामव्यवस्था

अनेक खेड्यांचा मिळून परगणा बनलेला असे. शेरशहाने ग्रामव्यवस्थेत फारसा बदल केला नाही. मुकादम हा खेड्याचा प्रमुख असे. त्याच्या जोडीला खेड्याचा कारभार पार पाडण्यासाठी ज्येष्ठ लोकांचे मंडळ असे. हे सर्वजण ग्रामपंचायतीचा कारभार पाहत असत. गावातील सारा वसूल करून तो सरकारी तिजोरीत भरणे, गावच्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था ठेवणे. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य व न्यायनिवाडाविषयक कामे ग्रामपंचायतीला पार पाडावी लागत.

शेरशहाने प्रशासक म्हणून स्वतःचा ठसा उमटविला. शेरशहाच्या चलनविषयक सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. अत्यंत सुबक व प्रमाणबद्ध नाणी शेरशहाने वापरात आणली. सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांचा त्यात समावेश होता. शेरशहाचा १८० ग्रॅमचा चांदीचा रुपया अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. त्याच्या चलनविषयक कामगिरीबद्दल डॉ. कानुनगो म्हणतात, 'रुपया व पैसा ही नाणी कोणत्याही स्वरूपात भारतीय चलनात असेपर्यंत शेरशहाचे विस्मरण होणे शक्य नाही'.

Scanned with CamScanner

शेरशहाच्या दळणवळणविषयक सुधारणाही महत्त्वाच्या आहेत. त्याने आपल्या अ[ल्प] कालखंडामध्ये प्रमुख चार मार्गांचे बांधकाम पूर्ण केले. सोनारगाव ते सिंधू (ग्रँड ट्रंक रोड), आग्रा ते बुऱ्हाणपूर, लाहोर ते मुलतान व जोधपूर ते चित्तोड हे चार मार्ग होत. या महामार्गांव[र] विश्रांतीसाठी १७०० सराया म्हणजेच विश्रामगृहे बांधली. लोकांच्या आरोग्यसेवेसाठी अनेक सरकारी दवाखाने सुरू केले. शेरशहाच्या व्यापारी धोरणामुळे व्यापाराची भरभराट झाली. महसूल व्यवस्थेतील सुसूत्रतेमुळे राज्याची आर्थिक स्थिती भक्कम झाली. शेरशहाची प्रशासन व्यवस्था एक उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था म्हणून ओळखली जाते. सम्राट अकबरानेही शेरशहाच्या प्रशासन व्यवस्थेचा आधार घेतला आहे. महसूल, चलन, व्यापार व लोककल्याण याबाबतचे शेरशहाचे कार्य निश्चितच गौरवास्पद आहे.

## शेरशहाची लष्करी प्रशासन व्यवस्था

**(Military administration of Shershah)**

शेरशहा हा कुशल सेनानी होता. त्याने आपले प्रचंड लष्कर उभारले व त्याच्या साहाय्याने दिल्लीवर आपली सत्ता निर्माण केली. **डॉ. एस. सी. सरकार** Medival Indian History Vol - I या ग्रंथात म्हणतात, 'शेरशहाने अल्लाउद्दीनच्या सैन्यव्यवस्थेतील मुख्य तत्त्वांचा स्वीकार करून आणि त्यावर आपल्या सैन्याची उभारणी करून जास्त प्रबळ सैन्य उभे केले होते'.

**१. सैन्यसंख्या :** शेरशहाने राजधानीमध्ये दीड लाख घोडदळ, पंचवीस हजार पायदळ, तीनशे हत्ती एवढी फौज होती. राजधानीबाहेरील सैन्य संख्या एवढीच होती. या फौजेच्या लष्करी प्रशिक्षणाची जबाबदारी ठेवण्यात आली होती. शेरशहाने आपल्या पाच वर्षांच्या कालखंडात जे प्रचंड यश मिळविले त्यात त्याच्या लष्कराची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे.

**२. सैन्याची निवड :** लष्करी भरतीच्यावेळी शेरशहा स्वतः हजर राहत असे. अधिकाऱ्यांची नियुक्ती तो स्वतः करत असे. योग्यता व पात्रता असणाऱ्या सैनिकाचीच लष्करामध्ये निवड होई. सैनिकांना अधिकारपदी बढती देत असताना त्याच्या कर्तबगारीचा प्रामुख्याने विचार केला जाई. त्याचबरोबर लष्करी अधिकाऱ्यांची शिफारसही महत्त्वपूर्ण मानली जाई.

शेरशहाच्या सैन्यामध्ये अफगाणांची संख्या मोठी होती. ज्या पठाणी सरदारांनी दिल्लीचे राज्य मिळविण्यासाठी, साम्राज्यविस्तारासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविली त्यांना शेरशहाने बक्षिसे दिली व लष्करात अधिकाराच्या जागा दिल्या.

**३. नियमित पगारी लष्कराची उभारणी :** सुलतानशाही कालखंडामध्ये राजाच्या अडचणीच्या प्रसंगी प्रांतीय सुभेदारांकडून लष्कराची जमवाजमव केली जाई. हे लष्कर अकार्यक्षम असल्याने अनेक वेळा राजाला पराभवाचा सामना करावा लागत असे. शेरशहाने यावर मात करून नियमित पगारी लष्कराची उभारणी केली.

**४. सैन्यामधील कडक शिस्त :** शेरशहाने लष्करी शिस्तीवर भर दिला. सुलतानाशी स्वामिनिष्ठा ठेवली पाहिजे, लष्करी अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत याबाबत तो दक्ष



असे. राजाज्ञेचे उल्लंघन करणाऱ्यास मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येई. शेरशहाने लष्करी शिस्तीच्या जोरावर अनेक विजय मिळविले. आपल्या लष्कराकडून प्रजेस उपद्रव होणार नाही याबाबतची काळजी शेरशहाने घेतल्याचे दिसते. या काळात प्रत्येक सैनिकाचे कागदोपत्री वर्णन ठेवण्यात येत असे.

**५. लष्करी केंद्राची उभारणी :** शेरशहाने आपल्या पाच वर्षांच्या अल्प कारकिर्दीमध्ये अनेक विजय मिळविले. प्रचंड साम्राज्य उभे केले. प्रांत सरकार, परगणा व ग्राम अशी साम्राज्याची विभागणी केली. शेरशहाने महत्त्वपूर्ण शहरात, मोठ्या व्यापारी पेठांच्या ठिकाणी, लष्करीदृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी लष्करी केंद्राची उभारणी केली व याद्वारे आपला तेथे कायम अंमल राहील याची खबरदारी शेरशहाने घेतली होती.

**६. लष्करातील सामंतशाही नष्ट केली :** सुलतानशाही कालखंडामध्ये सामंतशाही मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. या सामंताकडे मुलकी व लष्करी अधिकार मिळाल्यामुळे काही प्रसंगी ते सम्राटाचे आदेशही झुगारत असत आणि या सरदारांची बंडे मोडून काढणे ही राजापुढील मोठी समस्या असे. शेरशहाने अशा सामंतावर आपला अंकुश ठेवला होता.

**७. घोड्यांना डाग देण्याची पद्धत :** घोड्यांची होणारी अदलाबदल टाळण्यासाठी घोड्यांना डाग देण्याची पद्धत शेरशहाने सुरू केली. लष्करी तपासणीच्या वेळी होणारा गोंधळ यामुळे नष्ट झाला. तसेच राजाच्या मदतीसाठी सुभेदार निकृष्ट प्रतीचे घोडे पाठवीत यामुळे यासही आळा बसला. उत्कृष्ट घोड्यांची होणारी विक्रीही यामुळे थंडावली व लष्करी धोरणावर याचा चांगला परिणाम झाला.

**८. पोलीस विभाग :** शेरशहाने साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी पोलीस विभागाची निर्मिती केली. याची जबाबदारी प्रत्येक विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांवर देण्यात आली. यानुसार प्रांताची पोलीसव्यवस्था राज्यपालाकडे तर सरकारची पोलीसव्यवस्था मुख्य शिकदाराकडे देण्यात आली. परगण्यात हीच व्यवस्था शिकदाराकडे आणि गावपातळीवर ग्रामप्रमुखाकडे ही व्यवस्था देण्यात आली होती. यानुसार पाटील किंवा मुकादम यांना ही कामगिरी पार पाडावी लागत असे. एखाद्या गुन्ह्याचा तपास न लागल्यास संबंधित अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येई. वेळप्रसंगी मृत्युदंडाची शिक्षाही देण्यात येई. पोलीस विभागामुळे गुन्हेगारांना जरब बसली व राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण झाली.

शेरशहाच्या प्रशासन व्यवस्थेबाबत **डॉ. आर.पी.त्रिपाठी** म्हणतात की, 'आधुनिक काळात शेरशहाची फाजील स्तुती करण्यात आली आहे. शेरशहाने नवीन असे काहीच केलेले नाही. जुन्या काळी व मोडकळीस आलेल्या संस्थांचे नूतनीकरण करून त्या जनहिताकरिता उपयोगात आणल्या. शेरशहाने निर्माण केलेली राजस्वनीती राज्यपद्धती व लष्करी सुधारणा त्याच्या आधीच अलाउद्दीनने प्रचारात आणली होती'. तर **विलियम इर्स्किम** म्हणतात की, 'शेरशहाच्या यशस्वी लष्करी शौर्यापेक्षा राज्यव्यवस्थापकत्व व प्रजापालकत्वाचे गुण अधिक प्रमाणात होते'.



Scanned with CamScanner

## शेरशहाचे मूल्यमापन

शेरशहा साहसी, पराक्रमी व रणनीतिज्ञ सेनानी होता. हुमायूनशी मोठ्या चिवटपणे झुंज देऊन त्याने दिल्लीची सत्ता हस्तगत केली होती. शेरशहाच्या धार्मिक धोरणाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत मात्र मुस्लीम शासकांच्या तुलनेत शेरशहाची धार्मिक नीती चांगली होती. त्याने आपल्या मुलकी व लष्करी प्रशासनात हिंदूंना स्थान दिले होते. शेरशहा प्रतिभासंपन्न शासक होता. शेरशहाची जमीनमहसूल पद्धती अभिनव पद्धतीची होती. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शेरशहास महान शासक म्हणून अनन्यसाधारण असे स्थान आहे. **विल्यम अर्किन्स** शेरशहाबाबत म्हणतात की, 'आपल्या बुद्धिमत्तेचा कुशल वापर करून शेरशहा सिंहासनाधिष्ठित झाला. स्वसामर्थ्याने तो फरीदचा शेरखान झाला व नंतर शेरखानचा शेरशहा झाला. हिंदुस्थानात पठाणी राज्य स्थापन करण्याचे त्याचे स्वप्न होते व त्यादृष्टीने अखंड प्रयत्न करून त्याने ते स्वप्न पूर्ण केले'.

शेरशहा हा हाडाचा सैनिक व असामान्य सेनानी होता. रणांगणावर तो स्वतः हजर राहत होता. रणनितीमध्ये तो निपुण होता. चौसा व बिलग्रामच्या लढाईने हे दाखवून दिले आहे. शेरशहा हा सतत युद्ध मोहिमांमध्ये व्यग्र असतानाही त्याने प्रशासनाकडे जराही दुर्लक्ष केल्याचे दिसून येत नाही. कायदा, न्याय, दळणवळण, धर्म, महसूल या प्रत्येक क्षेत्रामधील शेरशहाच्या सुधारणा नेत्रदीपक होत्या. **विलियम अस्कीन** म्हणतो की, 'शेरशहा आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर सिंहासनारूढ झाला आणि त्याने या उच्च पदासाठी स्वतःची पात्रता सिद्ध केली'. **डॉ.एस.नटराजन** म्हणतात की, 'प्रशासनातील परिपूर्णता, जागरूकता, तत्परता, कर्तव्यदक्षता व चारित्र्यशुद्धता या गुणांचा विचार केल्यास भारतीय इतिहासात शेरशहाचे स्थान अकबरापेक्षाही श्रेष्ठ आहे'. तर **डॉ.ए.एल.श्रीवास्तव** म्हणतात की, 'शेरशहाचे अथक परिश्रम, कर्तव्यनिष्ठा, कितीतरी सुधारणा व न्यायप्रेम यामुळे त्याला इतिहासात विशेष स्थान प्राप्त झाले आहे. सम्राट अकबर सोडून कोणत्याही मध्ययुगीन भारतीय सम्राटाला एवढे जनकल्याणकारी कार्य करण्याचे श्रेय प्राप्त झाले नाही'.

शेरशहाने आपल्या अल्प कारकिर्दीमध्येही विविधांगी सुधारणा करून आपला ठसा उमटविला. जर त्यास जादा कालखंड मिळाला असता तर तो काय करू शकला असता याबाबत **व्हिन्सेंट स्मिथ** म्हणतात की, 'शेरशहाला आणखी आयुष्य लाभले असते तर दिल्लीच्या गादीवर पठाणांची सत्ता कायमची प्रस्थापित झाली असती आणि इतिहासाच्या रंगमंचावरून मुघलांचा कायमचा अस्त झाला असता'. तर **झुल्फिकार अली** म्हणतात की, 'शेरशहाने विविध संप्रदायांच्या लोकांना एका सूत्रात बांधून साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शेरशहाला अधिक आयुष्य लाभले असते तर भारतात राष्ट्रीय एकात्मतेचे सुंदर चित्र तयार झाले असते'.

**डॉ.श्रीराम शर्मा** शेरशहाची महान राज्यकर्त्यांशी तुलना करताना म्हणतात की, 'जहागीरदारांशी केलेल्या व्यवहाराच्या बाबतीत ७ व्या हेन्रीशी, सैन्य संघटन व अंतर्गत प्रशासन याबाबत प्रशियाचा महान शासक फ्रेडरिक विल्यम प्रथमशी, त्याचप्रमाणे व्यावहारिक दृष्टिकोण



व राजकीय सिद्धांत याबाबतीत कौटिल्य आणि मॅकियाव्हॅली आणि उदारता व प्रजाहित दक्षता याबाबतीत अशोकाशी तुलना करणे अयोग्य होणार नाही'.

इतिहासकार **क्रूक्स** म्हणतो की, 'Shershah was the first king to attempt to found an empire broadly based upon the people's will'.

## मनसब व जहागीर .

मुघल मुलकी व लष्करी यंत्रणेमध्ये अमीर उमरावांना अनन्यसाधारण असे स्थान होते. लहान-मोठ्या सरदारांना मनसबदार पद्धतीत समाविष्ट करण्यात आले होते. **'मनसब'** हा अरेबिक शब्द असून त्याचा अर्थ पद किंवा दर्जा असा आहे. मनसबदार या शब्दावरून त्याचे पद, श्रेणी, अधिकार व पगार यांची कल्पना येत होती. मनसबदार पद्धतीचा अवलंब तुर्कांच्याकडून सुलतानांनी केला व पुढे अकबराने याच पद्धतीचा अवलंब केला. सम्राट अकबर हा मनसबदार पद्धतीचा निर्माता नसून या पद्धतीतील दोष दूर करून या पद्धतीस शास्त्रशुद्ध स्वरूप प्राप्त करून देणारा होता म्हणून अकबराचे नाव या पद्धतीशी जोडण्यात आले.

### मनसबदार पद्धतीची वैशिष्ट्ये

१. मनसबदार म्हणून सर्वांना संधी देण्यात आली होती. त्यामध्ये तुर्क, इराणी, अफगाणी व रजपूत यांचा समावेश होता. मुस्लीम धर्मवाद्यांच्या मतानुसार काफरांना 'कुफ' करण्याची संधी देणे मान्य नव्हते. परंतु आपण ज्या प्रजेवर राज्य करतो त्या लोकांना आपल्या प्रशासनात सामावून घेणे, त्यांच्या सहकार्याने राज्याची वृद्धी करणे हा अकबराचा मानस होता. अकबराने हिंदू राजकन्याशी विवाह करून आपला दृष्टिकोण व्यक्त केला होता. रजपुतांना मोठ-मोठे हुद्दे बहाल करून सर्वसमावेशक तत्त्वांचा अवलंब केला होता. मानसिंग, जसवंत सिंग, मिर्झा राजे जयसिंग हे अकबराचे पराक्रमी सरदार होते. अकबराच्या कालखंडानंतर मराठ्यांचाही मनसबदार म्हणून समावेश झाला. परंतु या वेळी राज्यकर्त्यांच्या असहिष्णू धोरणाने आपले आसन प्रबळ केले होते.

२. मनसबदारांच्या तीन श्रेणी करण्यात आल्या होत्या.

(अ) १० ते ४०० सैन्य बाळगणारा अधिकारी मनसबदार म्हणून ओळखला जाई.

(ब) ५०० ते २५०० सैन्य बाळगणारा अधिकारी उमराव म्हणून ओळखला जाई.

(क) २५०० ते १०,००० सैन्य बाळगणारा अधिकारी उमराव-इ-अकबर म्हणून ओळखला जाई.

अकबराने १०,०००ची मनसब राजपुत्र सलीम यास दिली होती. मंत्रिमंडळातील पदासाठी वरिष्ठ दर्जाचाच मनसबदार असावा अशी अट नव्हती. अबुल फजल हा २५००चा मनसबदार असूनही अकबराने त्यास मंत्रिपद दिले होते. तर अझीझ कोका यास ५०००ची मनसब असूनही तो मंत्रिपदी नव्हता.

३. बड्या जमीनदारांची शक्ती व प्रतिष्ठा यामुळे त्यांना मनसब देण्यात येत होती. अमीर-उमराव कुटुंबातील व्यक्तींना मनसबदारांचे वारस म्हणून मनसब देण्यात येत होती. अशा वेळी

Scanned with CamScanner

त्यांची मूळची जहागीर त्यांच्याकडेच राहूनही नवीन जहागीर त्यांना देण्यात येत असे. तसेच प्रबळ सेनापती व परकीय सत्तांच्या सेनापतींनाही मनसब देण्यात येत होती.

४. अकबराने मनसबदार पद्धतीत झात व सवार हे हुद्दे निर्माण केले. मनसबदारांवर त्यांना सुचविण्यात आलेल्या श्रेणीएवढे सैन्य बाळगण्याची सक्ती नव्हती. यामुळे श्रेणी आणि प्रत्यक्षात असलेले सैन्य यामध्ये मोठी तफावत पडत होती. म्हणून झात व सवार या नवीन हुद्यांची निर्मिती केली.

५. मनसबदारांकडे असणारे लष्कर, शस्त्रास्त्रे, हत्ती, घोडे, उंट इत्यादींचा त्यांना तपशील ठेवावा लागे. या बाबींची पाहणी सरकारी पातळीवरून केली जात होती.

६. मांडलिकत्व स्वीकारणाऱ्या राजांनाही ठरावीक श्रेणी देण्यात येत होती. युद्धाच्या प्रसंगी सम्राटाला मदत करावी लागे. असे मांडलिक मनसबदार दरबारात हजर राहिले पाहिजेत असे बंधन नव्हते.

७. १० स्वारांच्या मनसबदारांस मासिक १०० रुपये तर १०,००० स्वारांच्या मनसबदारास मासिक ६०,००० रुपये वेतन मिळत असे. मनसबदारांच्या मासिक वेतनाचे आकडे **ऐन-ए-अकबरी**मध्ये देण्यात आले असले तरी मनसबदारांना त्यांच्याकडे असणाऱ्या लष्करासाठी वार्षिक पगार दिला जात होता की नाही याबाबत एकमत नाही. **डॉ. व्ही. ए. स्मिथच्या** मते, 'मनसबदारांना जास्तीतजास्त ९ महिन्यांचा पगार दिला जात होता'. तर **डॉ. ए. एल. श्रीवास्तव** म्हणतात, 'मनसबदारांना वर्षभर पगार दिला जात होता'.

## नेमणूक पद्धत

मनसबदारांची नेमणूक बादशहाकडून केली जात असे. प्रांतीय अधिकारी लष्करी सेनापती व राजपुत्र यांच्याकडून याबाबतच्या शिफारशी येत असत. बादशहा अशा उमेदवारांची मुलाखत घेत असे. बादशहाच्या संमतीनंतर संबंधित उमेदवाराचे कागदपत्र दिवाण, बक्षी, साहिब-ए-तौजी यांच्याकडून तपासले जात असे व यानंतर बादशहाकडे ते अंतिम मंजुरीकरिता पाठविले जाई. बादशहाच्या मंजुरीनंतर सहीशिक्क्यानिशी नेमणूकपत्र संबंधित मनसबदारांस देण्यात येत असे. सम्राटाचा वाढदिवस अथवा महत्त्वपूर्ण समारंभाच्या वेळी मनसबदारांना बढती, बदली दिली जात असे. मनसबदारांकडून गैरवर्तन होऊ नये म्हणून त्यास एक जामीन द्यावा लागत होता. गैरप्रकार घडल्यास मनसबदारांप्रमाणेच जामीनदारांसही जबाबदार धरण्यात येई.

## मनसबदार पद्धतीचे गुण

१. मनसबदाराची नियुक्ती राजाकडून केली जात असे. राजाचा त्यांच्यावर अंकुश असे. त्यामुळे ते सम्राटाशी एकनिष्ठ वागत होते.

२. मनसबदारांच्या वरचेवर बदल्या केल्या जात असत. मनसबदारांचे ठरावीक भागामध्ये हितसंबंध वाढीस लागणार नाहीत ते शिरजोर होणार नाहीत याची दक्षता घेतली जात होती. सम्राटाचा त्यांच्यावर अंकुश होता.

३. मनसबदार पद्धतीत लष्करी व मुलकी कारभाराबाबत कर्तबगारी दाखविणाऱ्या व्यक्तीलाच संधी मिळत होती. कर्तबगारीचा ठसा उमटविणाऱ्या मनसबदारांना बढतीही मिळत होती.



४. मुघल साम्राज्य स्थिर व सामर्थ्यशाली होण्यासाठी मनसबदार पद्धतीचा मोठा हातभार लागला.

५. मनसबदाराच्या बंडाळीला यामुळे आळा बसला. कारण अंतिम अधिकार सम्राटाकडे एकवटले होते.

## मनसबदार पद्धतीचे दोष

१. मनसबदारांना जेवढी मनसब देण्यात येत होती तेवढे लष्कर ठेवण्याची त्यांच्यावर सक्ती होत नव्हती. मात्र मनसबदार सरकारकडून मनसबच्या संख्येएवढा पगार व खर्च उचलत होते. मनसबदार हा खर्च उचलण्यासाठी खोट्या नोंदी ठेवत असत. मनसबदारांकडील लष्कराची तपासणी केली जाई. यामध्येही तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना लाच देण्यात येई. खोटे सैन्य व घोडेस्वार दाखविण्यात येत असत. मुघल काळातील या भ्रष्टाचाराबाबत **विलियम इर्विन** म्हणतो की, 'मनसबदारी पद्धतीत भ्रष्टाचार माजून पुढील काळात मुघल सैन्याचा व पर्यायाने मुघलांच्या शक्तीचा ऱ्हास झाला'.

२. अकबराच्या कालखंडामध्ये व त्यानंतर मनसबदारांना मिळणारे वेतन त्यांच्या सैन्य संख्येच्या प्रमाणात जास्त होते. त्यातच एखादा मनसबदार मृत्यू पावल्यास त्याची मालमत्ता सरकारजमा केली जाई. यामुळे आपल्याकडील संपत्तीचा जास्तीतजास्त उपभोग होण्याकडे लोकांचा कल असे. इटालियन प्रवाशी **मनूची** म्हणतो की, 'दाऊदखान हा मनसबदार आपल्या घरगुती पक्षी व प्राण्यांवर वार्षिक २५,००० रुपये खर्च करीत असे तर इस्लामखान प्रतिवर्षी नृत्यांगनांवर १,००,००० रुपये खर्च करी'. यावरून मनसबदारांची विलासी वृत्ती प्रत्ययास येते.

३. मुघल सैन्यामध्ये एकजिनसीपणा राहिला नाही. कारण सैन्यामध्ये मनसबदारा व्यतिरिक्त इतरही दाखिल, अहिदी सारखे प्रकार होते. यामुळे लष्करात शिस्त, प्रशिक्षण, शस्त्रास्त्रे व लष्करी रचना याबाबत एकवाक्यता राहिली नाही.

४. मनसबदार व्यवस्थेमुळे लष्कराचा संबंध प्रत्यक्ष मुघल सम्राटाशी येत नसे. ते मनसबदाराशी एकनिष्ठ असत. सैनिकास राजापेक्षा मनसबदार जवळचा वाटे. मनसबदारही आपणास हवे असणारे लष्कर आपल्या पदरी ठेवी. आपल्या जात, धर्मपंथाचा त्यात समावेश करी.

५. मनसबदारांच्या चैनी, विलासी वृत्तीमुळे सैन्यही त्याच प्रकारचे बनत असे. अकबराच्या कालखंडामध्ये याचा प्रत्यय आला नसला तरी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्ध कालखंडामध्ये मुघल मनसबदार व लष्कर यामध्ये रममाण झालेले दिसून आले. परिणामतः मुघलांना पराभवाला सामोरे जावे लागले.

६. मनसबदार पद्धतीमुळे तोफखाना विभाग, नौदल विभाग यांच्याकडे दुर्लक्ष झाले. तोफखाना विभागात विदेशी लोकांचा शिरकाव झाला. तर नौदलाकडील दुर्लक्षामुळे सागरी

Scanned with CamScanner

किनारपट्टी असुरक्षित होऊन युरोपियनांचा किनारपट्टीच्या भागामध्ये हस्तक्षेप सुरू झाला.

७. मुघलांच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण म्हणून मनसबदार पद्धतीस दोष दिला जातो. कारण ही पद्धती अत्यंत खर्चीक असून लष्कराची कार्यक्षमता या पद्धतीमुळे राहिली नाही.

### जहागीर

मनसबदारांमध्ये दोन प्रकार होते. एक नकदी **मनसबदार** व दुसरा **जहागीरदार**. पहिल्या प्रकारातील मनसबदारांना रोख वेतन (नकद) मिळत असे. तर दुसऱ्या प्रकारातील मनसबदारांना वेतनाऐवजी जहागीर मिळत होती. यामुळे त्यांना जहागीरदार असे संबोधले जाई. जहागिरीचे उत्पन्न वेतनाइतके मिळण्याची दक्षता घेतली जाई.

जहागीर एकाच ठिकाणी देण्यात येत असे. संपूर्ण खेडे जहागीर म्हणून देण्यात येत असे. महाल अगर महसुली विभागानुसार जहागीर दिली जात असे. महाल व महसुली विभाग हे परगणा किंवा जिल्ह्याएवढे असत. या जहागिरीबाबत बादशाही हुकमामध्ये सर्व तपशील देण्यात येत असे. जहागीरदारांचे ठरावीक एका भागामध्ये हितसंबंध निर्माण होऊ नयेत, ते बंडखोर होऊ नयेत यासाठी जहागीर बदलण्याची पद्धत अस्तित्वात होती. जहागीरदारांकडील मूळ जहागिरी जमा करून त्यास नवीन जहागिरी दिली जाई. जहागिरीमध्ये होणाऱ्या बदलांमुळे जहागीरदारांवर सरकारचा अंकुश निर्माण झाला. जहागीरदारांकडून चांगले कार्य पार पाडले जाऊन सरकारच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ झाली. जमीनदारांना मनसबदार म्हणून बादशाही सेवेत समाविष्ट करतेवेळी त्यांना वेतनाऐवजी त्यांची जहागिरी दिली जात होती. बादशाही सेवेच्या मोबदल्यात त्यांना आपल्या जहागिरीतील महसूल वसुलाचा अधिकार होता. महसूल वसुलीसाठी जहागीरदाराच्या अधिकाऱ्यांना कानुंगो व चौधरी या अधिकाऱ्यांवर अवलंबून रहावे लागत असे तसेच फौजदार व काझी हे अधिकारी स्थानिक विभागामध्ये शांतता, सुव्यवस्था व न्यायदानाचे कामकाज पार पाडत असत. याचबरोबर वाकनीस हा अधिकारी आपल्या प्रदेशात घडणाऱ्या घटनांचा अहवाल बादशहाला पाठवीत असे. अशा प्रकारे जहागीरदाराला जहागिरी देण्यात आली असली तरीही सम्राटाने सरकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्यांच्यावर अंकुश ठेवला होता.

जहागीरदार आपल्या जहागिरीमध्ये महसूल व इतर कर गोळा करत असे. जहागिरीचे कामकाज चालविण्यासाठी अमील, अमीन, पोतदार व कारकून हे अधिकारी असत. अमील या अधिकाऱ्याकडे जहागिरीच्या महसूल वसुलीचे कामकाज असे. यासाठी अमील या अधिकाऱ्याकडून काही रक्कम घेण्यात येत असे. या रकमेस **'कब्ज'** असे संबोधले जाई. काही प्रसंगी जहागीरदार लिलाव पुकारूनही महसूल वसुलीचे काम करत असे. अर्थातच, जादा बोली बोलणाऱ्यास महसुलाचे काम मिळत असे. लिलाव घेणाऱ्यास इजारदार असे म्हटले जाई. इजारदार जादा महसूल मिळविण्यासाठी स्वतःच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचा छळ करत असे. अमीन हा जहागीरदाराचा नोकर असून त्यास महसूल ठरविण्याबाबतचे अधिकार देण्यात आले होते. पोतदार या अधिकाऱ्याकडे जहागिरीच्या खजिन्याचे कामकाज सोपविण्यात आले होते. तर कारकून या अधिकाऱ्याकडे जहागिरीमधील हिशेबाचे काम करावे लागत होते.



### मनसबदारी जमिनीचे स्वरूप

जमिनीच्या मालकीबाबत जहागीरदारांच्या मालकीच्या, जमीनदारांच्या मालकीच्या आणि खाजगी शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी असे प्रकार होते. या सर्व जमिनींवर अंतिम अधिकार सम्राटाचा असे. मनसबदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाकडून 'मुतालिबा' ची रक्कम सरकारजमा झाल्यानंतर त्या जमिनीचा ताबा त्याच्या वारसास देण्यात येत असे. या पद्धतीमुळे मनसबदारांना आपल्या जहागिरीची शाश्वती वाटत होती. खाजगी संपत्ती सरकारजमा करण्याची पद्धत मुघल काळात होती. मात्र अपवादात्मक अशा प्रसंगी हे घडत असे. खाजगी संपत्तीवर हक्क सांगणे हे कुराणातील कायद्याचा भंग करणारे होते. त्यामुळे खाजगी संपत्तीबद्दल लोकांना शाश्वती होती. तुर्कांच्यामध्ये सुरुवातीच्या कालखंडात संपत्तीची मालकी सामूहिक असे. त्यामधील सदस्यांना त्यांच्या हयातीपर्यंत संपत्तीचा लाभ घेता येई. हयातीनंतर वैयक्तिक संपत्ती सरकार जमा करण्यात येत असे. पुढे इस्लाम धर्माच्या स्वीकारानंतरही याच पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला दिसतो.

## (ब) राज्य आणि धर्म

अल्पसंख्याक मुस्लिमांनी बहुसंख्याक हिंदूंवर वर्चस्व प्रस्थापित करून आपले राज्य स्थापन केले. धार्मिक प्रश्नावरून संघर्ष निर्माण होऊन राज्याला धोका पोहोचणार नाही याची खबरदारी मुघल राज्यकर्त्यांनी घेतली. तत्कालीन उलेमांनी लावलेला इस्लाम धर्माचा अर्थ आणि हिंदू प्रजेला हवे असलेले स्थिर राज्य या दोन्ही बाबी परस्परविरोधी असताना राज्यकर्त्यांनी सुरुवातीच्या काळात स्वीकारलेले धोरण समन्वय साधणारे होते. इ.स. १५२६ च्या पानिपतच्या युद्धानंतर बाबराने भारतात आपले राज्य निर्माण केले. बाबर आणि हुमायून हे कट्टर सुन्नी पंथीय होते. बाबर आपले राज्य स्थिर करण्यासाठी गुंतला असल्याने हिंदूंच्या विरोधाची चिकित्सा करण्यास त्यास वेळ मिळाला नाही.

बाबराने सुरू केलेला जिझिया हा हिंदू धर्मीयांवरील कर हुमायूनच्या कालखंडात सुरू होता. राज्यकर्त्यांचा असहिष्णू धोरणाकडे कल वाढू लागला. शिया-सुन्नी हा इस्लाम धर्मांतर्गत वाद होताच. हुमायून हा सुन्नी पंथीय असला तरी त्याची पत्नी हमीदाबेगम व त्याचा विश्वासू सहकारी बैरामखान हे शिया पंथीय होते. तसेच हुमायूनच्या भटकंतीच्या काळामध्ये इराणच्या शहाने त्यास मदत केली आणि त्याचा मोबदला म्हणून हुमायूनला शिया पंथाचा स्वीकार करणे भाग पडले. इस्लाम धर्मीयांना या काळात झुकते माप मिळत असले तरी हिंदू धर्मीयांचा नियोजनबद्ध छळ या काळात केला जात नव्हता.

अकबराने राज्याला स्थैर्य मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आपण ज्या प्रजेवर राज्य करतो ती बहुसंख्य हिंदू आहे याची जाणीव अकबरास होती. हिंदू-मुस्लीम यांच्यात सलोखा राहील असे धोरण त्याने स्वीकारले. हिंदूवर लादण्यात आलेला जिझिया व यात्रा कर अकबराने रद्द केला. यामुळे हिंदू धर्मीयांचा इस्लाम राज्यकर्त्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. मुस्लिमांना धार्मिक कार्याकरिता 'जकात' नावाचा कर द्यावा लागे. ही रक्कम

Scanned with CamScanner

सरकार धर्मादायाकरिता खर्च करत असे. मुस्लिमेतरांना या करामधून वगळण्यात आले होते. या कराऐवजी त्यांच्यावर जिझिया कर आकारण्यात येत होता.

## १. सम्राट अकबराचे धार्मिक धोरण

हिंदू आणि मुस्लीम यांना एकत्र आणून त्यांच्याकडून राज्य चालविण्याची कसरत करण्यात अकबर यशस्वी झाला. विशिष्ट एखाद्या धर्माचा कट्टरपणे पुरस्कार करून राज्यविस्तार करणे अडचणीचे ठरणार होते. म्हणून अकबराने राज्य आणि धर्म यांची एकमेकांपासून फारकत केली. नोकरभरती करताना अकबराने धर्म, जात, संप्रदाय असा भेदभाव न करता योग्यतेनुसार संधी दिल्या. त्यांच्या काळातील १२ प्रांतांच्या १२ अर्थमंत्र्यांपैकी ८ जण हिंदू धर्मीय होते. राज्याच्या सेवेमध्ये गुणानुसार संधी देण्याचा अकबराचा प्रयत्न नेपोलियनच्या कितीतरी पूर्वकाळात झाल्याचे दिसून येते. अकबराच्या सुसंस्कृत धोरणाचा हा भाग होता. अकबराने रजपुतांशी नातेसंबंध जोडून त्यांचा राज्यकारभारासाठी योग्य उपयोग करून घेतला. योग्यतेनुसार त्यांना मनसब देऊ केली. यामुळे हिंदू - मुस्लीम यांच्यातील दुरावा नाहीसा होण्यास मदत झाली.

(अकबराने एक महजर प्रसिद्ध करून आपण कुराणाच्या अधीन राहून सामाजिक कायद्याबाबत अंतिम न्याय देऊ शकतो असे जाहीर केले आणि या माध्यमातून स्वत:ची व राज्याची धर्मपंडितांच्या वर्चस्वापासून सुटका केली.) आजचे धर्मनिरपेक्ष राज्य ज्या तत्त्वांवर आधारलेले आहे त्या तत्त्वांना अनुसरून राज्य करणारा अकबर हा सुसंस्कृत राजा होय. व्यक्तिगत धार्मिक स्वातंत्र्य जपण्यासाठी जामा मशिदीत दर शुक्रवारी होणारी सक्तीची प्रार्थना अकबराने बंद केली. अकबराने सर्व धर्मीयांना विश्वासात घेऊन त्यांना सामान्य नागरिकत्व बहाल केले. उलेमांचा राज्यावर असणारा प्रभाव नाहीसा करून राज्याला स्वतंत्र दर्जा प्राप्त करून दिला.

### सम्राट अकबराच्या उदारमतवादी धार्मिक धोरणाची पार्श्वभूमी

लहानपणापासूनच अकबरावर उदारमतवादी विचारांचा प्रभाव पडला होता. वडील हुमायून सुन्नी पंथाचे तर आई हमीदाबेगम शिया पंथाची होती. अकबराचा पालक बैरामखानही शिया पंथीय होता. तसेच अकबरास जे गुरू लाभले ते अब्दुल लतीफ देखील शिया पंथीय होते. या सर्वांचा प्रभाव अकबरावर पडणे साहजिकच होते. त्यामुळे अकबराचे धोरण हे सहिष्णू बनले.

अकबराची संस्कारक्षम वयातच रजपूत कन्यांबरोबर लग्ने झाली. आपल्या राण्यांचा स्वभाव, त्यांची पूजा-अर्चा या सर्व बाबींचा त्याच्यावर प्रभाव पडला. रजपूत राजांनी अकबराच्या साम्राज्यविस्तारात मोठे योगदान दिले. यामुळे रजपुतांबद्दल म्हणजेच पर्यायाने हिंदूंच्याबद्दल अकबरास प्रेम वाटत होते.

अकबराचे अत्यंत जवळचे सहकारी शेख अबुल फजल व शेख अबुल फैजी हे दोघेही पुरोगामी विचारांचे होते. त्यांचे वडील शेख मुबारक हे सुफी पंथाचे विचारवंत असून ते



उदारमतवादी विचारांबद्दल प्रसिद्ध होते. याचबरोबर अकबराचा अनेक धर्मपंडितांशी संबंध आला. शीख संप्रदाय, सुफी संप्रदाय यांच्या विचारांच्या प्रभावामुळे अकबर उदारमतवादाकडे झुकू लागला. लहानपणापासून अतिशय चिकित्सक असणाऱ्या अकबराने अनेक बाबींचा चिकित्सक अभ्यास केला व उदार धार्मिक धोरणाचा अवलंब केला.

### सम्राट अकबराने हिंदूप्रती उदार धोरणाचा अवलंब करून घेतलेले निर्णय

१. इ.स. १५६२ मध्ये रजपूत राजा बिहारीमलची कन्या जोधाबाई हिच्याबरोबर अकबराचा विवाह झाला. यानंतरही काही रजपूत राजकन्यांशी अकबराने विवाह केले. परिणामत: रजपुतांशी रक्ताचे संबंध निर्माण झाल्याने त्यांच्याशी त्याने मैत्रीचे धोरण स्वीकारले.

२. इ.स. १५६३ मध्ये हिंदूंना द्यावा लागणारा तीर्थयात्रा कर रद्द केला.

३. हिंदूंच्या दृष्टीने अत्यंत अप्रिय व हिंदूंची मानखंडना करणारा जिझिया कर अकबराने इ.स. १५६४ मध्ये रद्द केला.

४. हिंदूंना धार्मिक स्वातंत्र्य देऊन त्यांचे सण साजरे करण्याची मुभा दिली. अकबराने रक्षाबंधन, दसरा, महाशिवरात्र हे उत्सव दरबारच्या वतीने साजरे करण्यास सुरुवात केली.

५. धर्म, पंथ, जात असा भेद न करता गुणवत्तेवर आधारित नोकऱ्या देण्याची भूमिका घेतली. यामुळे राजा मानसिंग, राजा तोरडमल, राजा भगवानदास इत्यादी उच्च पदावर विराजमान झाले. अकबराच्या या धोरणामुळे बुद्धिवान व कर्तबगार लोक पुढे आले.

६. सर्व धर्मीयांना आपापली प्रार्थना मंदिरे बांधण्याची परवानगी देण्यात आली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधण्यात आली. हुगळी येथे चर्च बांधण्याचीही परवानगी देण्यात आली.

७. सक्तीच्या धर्मांतरावर बंदी घालण्यात आली. ज्यांचे सक्तीने धर्मांतर झालेले असेल त्यांना परत आपल्या धर्मात जाण्याची मुभा देण्यात आली.

८. हिंदूंच्या धर्म ग्रंथांचे ज्ञान सर्वांना व्हावे. मुस्लिमांना त्याची ओळख व्हावी यासाठी रामायण, हरिवंश, योगवशिष्ठ्य या पवित्र हिंदू ग्रंथांचे फारसी भाषेत भाषांतर केले. हिंदू ग्रंथांच्या भाषांतरासाठी अकबराने स्वतंत्र विभागाची स्थापना केली.

९. गाय ही हिंदूंना पवित्र असल्यामुळे गोहत्येस बंदी आणणारा कायदा अकबराने पास केला.

१०. गुलामांच्या खरेदी विक्रीवर अकबराने कडक निर्बंध लादले.

### (अ )सम्राट अकबराच्या धार्मिक कल्पना

**इबादतखानाची निर्मिती :** अकबर हा अशिक्षित असला तरी तो जिज्ञासू होता. एखाद्या बाबीवर सारासार विचार करून निर्णय घेणे त्यास आवडत होते. धर्माचे खरे स्वरूप व मूलतत्त्वे जाणून घेण्याची त्याची इच्छा होती. यासाठी इ.स. १५७५ मध्ये सम्राट अकबराने फत्तेपूरसिक्री येथे **इबादतखाना** (प्रार्थना स्थळा) ची उभारणी केली व या ठिकाणी बादशहा स्वत: दर

Scanned with CamScanner

गुरुवारी संध्याकाळी व शुक्रवारी संपूर्ण दिवसभर उपस्थित राहत असे. प्रारंभीच्या काळात शे इबादतखान्यात शेख, सय्यद या सरदारांनाही प्रवेश होता. इबादतखान्यात धार्मिक चर्चेसाठी येणाऱ्या इस्लाम धर्मपंडितांत दोन वर्ग होते. एक कट्टर सनातन विचारांचा व दुसरा सुधारणावादी विचारांचा. सनातनी वर्गातर्फे शेख मखमुद, उलमुख व शेख अब्बूनबी हे भाग घेत तर सुधारणावादी वर्गातर्फे अबुल फजल, मुबारक हैजी हे भाग घेत. इबादतखान्यातील दोन गटांमध्ये झालेला वादविवाद ऐकून दोन्ही गटांतील मतभेद पाहून अकबराचा इस्लाम धर्म-मार्तंडावरचा विश्वास नष्ट झाला. त्याला इतर धर्मीयांची मते जाणून घ्यावे असे वाटू लागले.

### इबादतखान्यात सर्वधर्मीयांना प्रवेश

इस्लाम धर्मातील पायाभूत तत्त्वाबाबत एकमत होत नाही हे पाहून अकबराने सर्व धर्म-पंडितांना इ.स. १५७८ मध्ये इबादतखान्यात चर्चेसाठी बोलविण्यात आले. यामध्ये हिंदू धर्मातर्फे पुरुषोत्तम आणि देवी, जैन धर्माच्या वतीने हिरा, विजय सुरी, जीनचंद्र तर पारसी धर्मीयांच्या वतीने दस्तुर मेहरजी राणा इत्यादी धर्मपंडित चर्चेसाठी आले. इ.स. १५७९ मध्ये गोव्याच्या धर्मगुरूंनाही चर्चेसाठी इबादतखान्यात आमंत्रित करण्यात आले.

सम्राट अकबराने या सर्व धर्मगुरूंच्याकडून आपापल्या धर्माची मूलतत्त्वे जाणून घेतली. अकबराची ग्रहणशक्ती प्रचंड होती. सर्व धर्मातील सार, सत्य एकत्र आणून त्यांना एका सूत्रामध्ये एकत्र आणण्याची आवश्यकता अकबरास वाटू लागली. भारतात अनेक धर्म असल्यामुळे राज्यवृद्धीसाठी या सर्वांना बरोबर घेऊन जाणे अकबरास आवश्यक वाटू लागले. तसेच इस्लाम धर्मातील अधिकाराबाबत ठोस निर्णय घेण्याची त्यांना निकड वाटू लागली.

### सम्राट अकबर इस्लाम धर्माचा सर्वोच्च काझी बनला.

राज्यसत्तेवर वर्चस्व ठेवू पाहणाऱ्या इस्लाम धर्मगुरूंना शह देण्याचा विचार अकबराने केला. त्याने ९ मे, १५७९ रोजी फत्तेपूरसिक्री येथील धर्मगुरूस पदच्युत करून स्वत:कडे सर्वोच्च धर्मप्रमुख म्हणून अधिकार घेतले. २२ जून, १५७९ रोजी फत्तेपूरसिक्री येथील प्रसिद्ध मशिदीत सम्राट अकबराने राजकवी फैजी याने तयार केलेला 'खुतबा' वाचला.

सम्राट अकबरास उलेमांचा प्रभाव कमी करून आपल्या हाती धार्मिक सत्ता घ्यावयाची होती. यासाठी अकबराने एक योजना आखली व अबुल फजल व अबुल फैजी यांचे वडील शेख मुबारक (शिया पंथी) यांना 'महजर' (उद्घोषणा) तयार करण्यास फर्मावले. सप्टेंबर, १५७९ मध्ये इस्लाम धर्मातील वादविवादाबाबत अकबरास अंतिम अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात येऊन, या महजरवर सर्व प्रमुख इस्लाम धर्मगुरूंच्या सह्या घेण्यात आल्या. नाइलाजास्तव धर्मगुरूंना सह्या करणे भाग पडले. या महजरला 'धार्मिक अत्युच्च अधिकाराचा हुकूम' असेही संबोधले जाते. या महजरचा अर्थ याप्रमाणे होतो.

१. या घोषणेनुसार अकबर हा सर्वोच्च राजकीय व धार्मिक नेता आहे. त्यास ईश्वरी ज्ञान झाले असून तो अत्यंत न्यायप्रिय राजा आहे.

२. धार्मिक प्रश्नाबाबत मतभेद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय देण्याचा अधिकार अकबरास असून तो सर्वांनी मान्य केला पाहिजे.



३. अकबराने घेतलेल्या धर्माबाबतच्या निर्णयाचे पालन सर्व उलेमा व इस्लाम समाज यांनी करणे अपरिहार्य आहे. धार्मिक आज्ञांचे उल्लंघन म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराशी द्रोह केल्यासारखे आहे.

अकबराच्या 'खुतबा' वाचनामुळे व 'महजर' च्या घोषणेमुळे उलेमा वर्ग असंतुष्ट झाला. इस्लाम धर्म धोक्यात आणण्याचा बादशहाचा हेतू आहे अशी उघड टीका ते करू लागले. बादशहाने सुन्नी पंथ सोडून शिया पंथाचा स्वीकार केला आहे अशा प्रकारची टीकाही होऊ लागली. सम्राट अकबराने या मतांचे खंडन केले. **अबुल फजल** म्हणतो की, '' बादशहावर होणारे आरोप हे निराधार असून बादशहाने इस्लाम धर्माचा कोणत्याही प्रकारे अनादर केला नाही.'' **व्ही.ए.स्मिथ** यांच्या मते, '' या महजरमुळे अकबर इस्लाम धर्माचा सर्वोच्च धर्मगुरू बनला. त्याच्या हाती राजसत्ता आणि धर्मसत्ता केंद्रित झाल्या.''

### सुल-इ-कुल

**'सुल'** म्हणजे **'समन्वयवादी'** आणि **'कुल'** म्हणजे **'सर्व '** म्हणजेच सर्वांना बरोबर घेऊन जाणारा किंवा संघर्ष टाळून वाटचाल करणारा. सुल-इ-कुल हा शब्द उर्दू असून 'उर्दू-मराठी शब्दकोश' या ग्रंथात संपादक जोशी व गोरेकर यांनी त्याचा तपशील दिला आहे.

सम्राट अकबराची आई हमीदाबेगम, गुरू अब्दुल लतीफ आणि पालक बैरामखान या सर्वांच्या सान्निध्यात अकबराची जडणघडण होत होती. अकबर सुन्नी पंथाचा असून देखील शिया पंथियांच्या व उदारमतवादी लोकांच्या सान्निध्यामुळे त्याने कट्टर धार्मिकतेला फाटा दिला व समन्वयवादी धार्मिक धोरणाचा अवलंब केला. इस्लाम धर्मामध्ये असणारे अंतर्गत वाद मिटवावेत, धर्माधर्मांमध्ये सलोखा निर्माण करावा या उद्देशाने अकबराने इबादतखान्यामध्ये सर्वधर्मीयांना चर्चेसाठी बोलाविले व त्यांच्यात धार्मिक चर्चा घडवून आणली आणि यामधून सर्व धर्मांची मूलतत्त्वे एकत्र आणून सर्व धर्मीयांत एकवाक्यता निर्माण करण्याची निकड अकबरास वाटू लागली आणि या पार्श्वभूमीवर 'दीन-ए-इलाही' या धर्माची निर्मिती झाली.

सम्राट अकबराने धार्मिक बाबतीतच समन्वयवादी भूमिका घेतली असे नाही तर सर्व क्षेत्रांमध्ये समन्वय साधून पुरोगामी धोरणाचा अवलंब केला गेला. शासकीय नोकरभरती करते-वेळी धर्म, जात, पंथ यांचा विचार न करता योग्यतेनुसार नोकऱ्या देऊ केल्या. यामुळे शासनात कार्यक्षमता निर्माण झाली. अकबराने रजपूतविषयक सलोख्याच्या धोरणाचा अवलंब करून मुघल साम्राज्याला स्थैर्य प्राप्त करून दिले. सर्व राज्यभर एकच प्रशासन पद्धती, एकच महसूल पद्धती निर्माण करून साम्राज्यात एकवाक्यता निर्माण केली. आपले विशाल राज्य निर्माण करण्यासाठी अकबराने सर्वांची मदत घेतली. हिंदू आणि मुसलमान दोघांनाही समतेची वागणूक दिली. थोडक्यात, सम्राट अकबराच्या सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करण्याच्या भूमिकेमुळे मुघल साम्राज्य स्थिर पायावर उभे राहिले.

### दीन-ए-इलाही

इस्लाम धर्मगुरूंच्या अतिरेकी धर्मप्रचारास अकबर कंटाळला. यामधून काहीतरी मार्ग काढण्याचा तो प्रयत्न करू लागला. इबादतखान्यात सर्व धर्मीयांचे विचार ऐकून अकबराच्या

Scanned with CamScanner

मनामध्ये सर्वमान्य एखाद्या नव्या धर्माची कल्पना आली. सर्व धर्मांतील उत्कृष्ट तत्त्वे एकत्र केली तर संपूर्ण मानवजातीचे कल्याण होईल. भारतातील हिंदू आणि मुस्लीम हे दोन प्रमुख धर्म एकत्र येतील. भारतात बहुसंख्य हिंदू असल्याने इस्लाम हा राष्ट्रधर्म होऊ शकत नाही याची जाणीव अकबराला होती. साम्राज्यात अनेक गट असणे ही राज्याच्या हिताचे नव्हते म्हणून इ.स.१५८२ मध्ये काबूलच्या स्वारीवरून परत आल्यानंतर सम्राट अकबराने आपले सर्व सरदार, अधिकारी विविध धर्मांचे प्रमुख यांना एकत्र बोलावून सर्वांना एकाच धर्मछत्राखाली आणण्याचा आपला मनोदय अकबराने स्पष्ट केला. सर्वांचा एकच राष्ट्रधर्म असावा याबाबत चर्चा झाली. सम्राट अकबराने या वेळी ' दीन-ए-इलाही ' या नवीन धर्माची घोषणा केली. या धर्मांची आचारसंहिता सहजपणे सर्वांना आचरता येईल अशी होती. या नवीन धर्मानुसार ईश्वर एक असून अकबर हा त्याचा प्रेषित समजण्यात आला.

## दीन-ए-इलाहीची वैशिष्ट्ये

१. दीन-ए-इलाही हा स्वतंत्र धर्म नसून सर्व धर्मांतील उदात्त तत्त्वे एकत्र आणून तयार केलेला तौलनिक धर्म होय.

२. या धर्माचा संस्थापक हा कोणी ज्ञानप्राप्ती झालेला साधु-संन्यासी नव्हता, तर स्वत: अकबर या धर्माचा निर्माता होता.

३. हा धर्म प्रचारावर भर देणारा नव्हता. अकबराने धर्मप्रसारासाठी सत्तेचा उपयोग केला नाही आणि धर्म स्वीकारणाऱ्या लोकांना कोणत्याही सोई-सवलती दिल्या नाहीत.

४. या धर्मांचे सभासद एकमेकांना अभिवादन करताना **'अल्ला हो अकबर'** (ईश्वर महान आहे) आणि **'जल्ले जल्लालहू'** (मी त्याचा सेवक आहे) असे म्हणत.

५. हा धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीस अबुल फजल राजासमोर नेत असे. त्या व्यक्तीस राजाच्या चरणावर नतमस्तक व्हावे लागे. मग बादशहा अशा व्यक्तीच्या डोक्यावर शिरस्त्राण (पागोटे) ठेवी व काही प्रसंगी अंगठीही देण्यात येई. पागोटे व अंगठी यावर 'अल्ला हो अकबर' हे शब्द कोरलेले असत.

६. अकबराचे निकटवर्ती शेख मुबारक, अबुल फजल, अबुल फैजी यांनी हा धर्म स्वीकारला होता तर राजा मानसिंग, राजा तोरडमल, राजा भगवानदास या निकटवर्तीयांनी या धर्मांचा स्वीकार केला नव्हता.

७. अकबराच्या मृत्यूबरोबरच ' दीन-ए-इलाही' हा धर्म संपुष्टात आला.

## दीन-ए-इलाहीची धर्मतत्त्वे व आचारसंहिता

'दीन-ए-इलाही' या धर्मांचे सिद्धांत (तत्त्वज्ञान) सर्वसामान्यांना समजतील असे होते व ते आचरण्यासही सोपे होते. अबुल फजलच्या 'ऐन-ए-अकबरी' या ग्रंथामध्ये दीन-ए-इलाही या ग्रंथाचे स्वरूप देण्यात आले आहे. त्यानुसार या धर्माची तत्त्वे व आचारसंहिता याप्रमाणे -

१. ईश्वर एकच असून अकबर हा त्याचा प्रेषित आहे.



२. या धर्माच्या सभासदांनी एकमेकांस अभिवादन करताना **'अल्ला हो अकबर'** व **'जल्ले जल्लालहू'** असे म्हणावे.

३. सूर्य व अग्नी या देवतांची उपासना करावी.

४. या धर्माच्या अनुयायांनी सकाळ, दुपारी व संध्याकाळी प्रार्थना करावी.

५. अकबर हा धर्माचा प्रेषित असल्याने त्याच्यासमोर अनुयायांनी नतमस्तक व्हावे.

६. रविवारचा दिवस पवित्र मानावा.

७. १६ वर्षांपूर्वी मुलाचा आणि १४ वर्षांपूर्वी मुलीचा विवाह करू नये.

८. निम्न दर्जाच्या लोकांबरोबर विवाहसंबंध करू नयेत. वृद्ध व अज्ञान मुलींशी विवाह करू नयेत.

९. धर्माचा अंगीकार करणाऱ्या सदस्यांनी शक्यतो मांसाहार टाळावा. जन्म झालेल्या महिन्यात तो पूर्णपणे वर्ज्य करावा.

१०. वाढदिवसाच्या प्रसंगी मोठी मेजवानी द्यावी. तसेच दानधर्म करावा.

११. या धर्माच्या अनुयायांकडे उदारता, क्षमाशिलता व परोपकार वृत्ती असावी. इतर धर्मबांधवांशी सौजन्याने वागावे.

१२. 'दीन-ए-इलाही' धर्म अनुयायांच्या चार श्रेणी करण्यात आल्या.

१. सम्राटाकरिता आपली संपत्ती अर्पण करणारी पहिली श्रेणी.

२. सम्राटाकरिता आपली संपत्ती व जीवित दान करणारी दुसरी श्रेणी.

३. सम्राटाकरिता आपली संपत्ती,जीवित व प्रतिष्ठा अर्पण करणारी तिसरी श्रेणी.

४. सम्राटाकरिता संपत्ती, जीवित, प्रतिष्ठा व धर्म दान करणारी चौथी श्रेणी.

## दीन-ए-इलाहीच्या अपयशाची कारणे

सर्वधर्मांतील उदात्त तत्त्वांचे एकत्रीकरण करूनही दीन-ए-इलाहीस लोकप्रियता मिळू शकली नाही. उदात्त तत्त्वांद्वारे निर्मिलेला हा धर्म तलवारीच्या जोरावर जनतेच्या गळी उतरविण्याची कल्पनाही अकबरास पटणारी नव्हती. त्यामुळे कोणावरही या धर्माची सक्ती करण्यात आली नाही. सम्राट अशोकाप्रमाणे राज्ययंत्रणेद्वारे धर्मप्रसार बादशहास शक्य होता पण तसा प्रयत्न त्याने केला नाही. अबुल फजलच्या अकाली मृत्यूमुळे अकबरांचा उत्साह मावळला आणि बादशहाच्या मृत्यूबरोबरच दीन-ए-इलाहीचाही लोप झाला. या धर्माच्या अपयशाची कारणे पुढीलप्रमाणे -

१. ' दीन-ए-इलाही 'हा धर्म काळाच्या कितीतरी पुढे होता. या धर्माने स्वीकारलेले ध्येय-धोरण काळाच्या पुढे होते. हा ध्येयवाद स्वीकारण्याची मानसिकता तत्कालीन समाजात नव्हती.

२. सर्वसामान्य माणसाला या धर्माचे तत्त्वज्ञान समजू शकले नाही. लोकांची संभ्रमावस्था झाली.

३. ' दीन-ए-इलाही ' हा एक नवीन धर्म आहे असे लोकांना वाटले नाही.

Scanned with CamScanner

४. सम्राट अशोकाप्रमाणे धर्मप्रसार करण्याची जिद्द अकबराकडे नव्हती. या धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी कोणतीही यंत्रणा वापरण्यात आली नाही.

५. ' दीन-ए-इलाही 'हा धर्म स्वीकारणाऱ्यांना कोणत्याही सोई-सवलती देण्यात आल्या नाहीत.

६. कट्टर सुन्नी पंथीयांनी 'दीन-ए-इलाहीस' पाठिंबा देण्यास साफ नकार दिला.

७. या काळातील समाज धार्मिक प्रभावाखाली होता. सनातन्यांचे त्यांच्यावर वर्चस्व होते. यामुळे लोकांना आपल्या धर्माचा त्याग करून 'दीन-ए-इलाही' हा नवीन धर्म स्वीकारावा असे वाटले नाही.

८. ' दीन-ए-इलाही ' धर्म स्वीकारणाऱ्यांची संख्या काही हजारांमध्येच होती. त्यातही प्रामुख्याने मुस्लीम होते. हिंदूंनी हा धर्म स्वीकारण्यात मुळीच स्वारस्य दाखविले नाही.

९. सम्राट अकबराने उलेमांचे अधिकार काढून घेतल्यामुळे या वर्गाने उघडपणे अकबराच्या धार्मिक धोरणास विरोध केला.

१०. या नवीन धर्माच्या अनुयायांना मांसाहाराबाबत बंधने घालण्यात आली. मुस्लीम समाजास ही बाब मान्य न झाल्याने तो समाज यापासून दूर राहिला.

११. अबुल फजलच्या अकाली मृत्यूमुळे ' दीन-ए-इलाही 'चा धर्मप्रचार थंडावला.

अशा अनेक कारणांमुळे सम्राट अकबराने निर्माण केलेला ' दीन-ए-इलाही ' हा धर्म अपयशी ठरला आणि समाजात एकोपा, धार्मिक सहिष्णुता, प्रेमभाव वाढीस लावून मानवी कल्याण साधण्याचा अकबराचा प्रयत्न विफल झाला.

## 'दीन-ए-इलाही' या धर्माबाबत विचारवंतांची मते

**प्रो. एस. आर. शर्मा म्हणतात की,** " 'दीन-ए-इलाही'ला नवीन धर्माची संज्ञा देणे चूक ठरेल. कारण या धर्माचा ना कोणता पवित्र ग्रंथ ना कोणी प्रेषित. अकबराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेली ही एक अशी व्यवस्था होती की, जिला धर्माचा मुलामा चढविण्यात आला होता."

**डॉ. व्ही. ए. स्मिथ** आपल्या 'Akbar the Great Mughal' या ग्रंथात म्हणतात की, 'दीन-ए-इलाही' हा धर्म अकबराच्या शहाणपणाचे द्योतक नसून त्याच्या मूर्खपणाचे प्रतीक आहे."

**डॉ. रायचौधरी** म्हणतात की, "'दीन-ए-इलाही' हा स्वतंत्र धर्म नसून तो इस्लामचाच एक भाग आहे."

**लेन-पूल च्या मते** ,"'दीन-ए-इलाही' हा धर्म म्हणजे तत्त्वज्ञान, गूढवाद आणि निसर्गपूजा यांचा समन्वय होय."

**डॉ. ए. एल. श्रीवास्तव** म्हणतात की, "'दीन-ए-इलाही' हा धर्म कोणत्याही अतिरेकीपणातून किंवा अंधश्रद्धेतून निर्माण झाला नसून त्यामागे त्याची चिंतनशील भूमिका



होती. हा धर्म म्हणजे अकबराच्या धार्मिक विचारांची, त्यांच्या मनात असलेल्या वैचारिक संघर्षाची उत्क्रांत अवस्था होय."

**डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्या मते,** "सर्व धर्मातील चांगल्या तत्त्वांचा योग्य समन्वय साधून अकबराने हा धर्म स्थापन केला."

## (ब) सम्राट अकबराचे इतर धर्मीयांशी संबंध

इबादतखान्याच्या माध्यमातून अकबराने सर्व धर्मीयांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. सर्व धर्मातील उदात्त तत्त्वांचे एकत्रीकरण करून मानवी कल्याण साधावे हा त्याचा दृष्टिकोण होता आणि म्हणून त्याने सर्व धर्मीयांशी चर्चा, विचारविनिमय केला होता.

**१. अकबर व हिंदू धर्म :** अकबराची प्रजा ही बहुसंख्य हिंदू होती. ज्यांच्यावर आपण राज्य करतो त्या हिंदू धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी अकबराने पुरुषोत्तम व देवी यांना चर्चेसाठी इबादतखान्यात बोलाविले. हिंदू धर्मामधील कर्मसिद्धांत व पुनर्जन्म सिद्धांताने अकबर प्रभावित झाला. अनेक रजपूत राजकन्यांशी त्याचे विवाह झाले होते. त्या राण्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे पूजा-अर्चा करण्यास परवानगी देण्यात आली होती. यामुळे अकबराला हिंदू धर्मीयांची जवळून ओळख झाली होती. त्याने रक्षाबंधन, दसरा, दिवाळी इत्यादी हिंदू सण साजरे करण्यास सुरुवात केली. गोहत्येवर (गाईंची हत्या) निर्बंध आणले. एवढेच नव्हे तर अकबराने आपल्या आईच्या मृत्यूनंतर डोक्याचे मुंडन केले.

**२. अकबर व शीख धर्म :** शीख गुरू रामदास, गुरू अमरदास, गुरू अर्जुनसिंग यांच्याबरोबर अकबराचा घनिष्ठ संबंध होता. गुरू अर्जुनसिंग यांच्या कार्याने अकबर प्रभावित झाला होता आणि यातून त्यास 'ग्रंथसाहेब' या शिखांच्या पवित्र ग्रंथाबद्दल आदर निर्माण झाला. अकबर ज्या ज्या वेळी पंजाबमध्ये जाई त्या त्या वेळी तो शीख धर्मगुरूंची भेट घेत असे व विचारविनिमय करत असे. शीख धर्मगुरूंच्या प्रभावाने मोहित होऊन अकबराने पंजाबमध्ये एक वर्ष शेतसारा माफ केला होता.

**३. अकबर व ख्रिश्चन धर्म :** इ.स. १४९८ मध्ये पोर्तुगिजांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी स्थापन केल्या. गोवा हे त्यांच्या व्यापाराचे केंद्र असले तरी इतर अनेक ठिकाणी त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला. गुजरातमधून मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंना पोर्तुगिजांनी उपद्रव देऊ नये यासाठी अकबराने त्यांच्याशी मैत्रीचा करार केला. अकबराने इबादतखान्यात सर्व धर्मीयांशी विचारविनिमय सुरू केला. इ.स. १५७९ मध्ये गोव्याच्या पोर्तुगिजांना धार्मिक चर्चेसाठी बोलाविण्यात आले. जेसुईट धर्मगुरूंना अकबराचे मतपरिवर्तन करण्यात यश आले नाही. यामुळे इ.स. १५९० मध्ये जेसुईट धर्मगुरूंचे दुसरे शिष्टमंडळ चर्चेसाठी आले आणि इ.स. १५९४ मध्ये जेसुईटांचे तिसरे शिष्टमंडळ अकबराबरोबर चर्चेसाठी आले. जेसुईटांनी अकबरास ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यात त्यांना यश मिळाले नाही. मात्र पोर्तुगिजांना ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याबाबत मोकळीक मिळाली.

Scanned with CamScanner

इ.स. १५८३ मध्ये भारतात व्यापारी सवलती मिळविण्यासाठी आलेल्या विलियम लिड्स आणि रॉल फिच या इंग्रजांना पोर्तुगिजांनी गोव्याच्या तुरुंगात डांबले. इंग्रजांचा अकबराच्या दरबारात शिरकाव होऊ नये हा त्या पाठीमागील उद्देश होता. यानंतर जॉन मेन्डेनहॉल हा इंग्रज व्यापारी महाराणी एलिझाबेथने सम्राट अकबरास लिहिलेले पत्र घेऊन भारतात आला. अकबराशी जवळीकता निर्माण करून जॉन मेन्डेनहॉलने अनेक सवलती मिळविल्या.

**४. अकबर व जैन धर्म :** सम्राट अकबराने इ.स. १५८२ मध्ये जैन धर्मगुरूंना निमंत्रित केले. यानुसार इबादतखान्यात होणाऱ्या चर्चेसाठी हिरा विजय सुरी आले होते. जैन धर्मामधील अहिंसा या तत्त्वाचा प्रभाव अकबरावर पडला. हिरा विजय सुरी, विजय सेन सुरी, जिनचंद्र या जैन धर्मगुरूंच्या व्रतस्थ जीवनाचा प्रभाव अकबरावर पडला. यानंतर अकबराने मांस खाणे वर्ज्य केले. पशुपक्ष्यांची शिकार करणेही सोडून दिले. एवढेच नव्हेतर जैन धर्मीयांच्या अहिंसेच्या प्रभावामुळे खाटिकखाने बंद केले. शिकार करण्यास मनाई करण्यात आली.

**५. अकबर व पारशी धर्म :** अकबराने धार्मिक चर्चेसाठी पारशी धर्मगुरू दस्तुर मेहरजी राणा यांना बोलाविले होते. अकबर आणि दस्तुर मेहरजी राणा यांच्यात झालेल्या चर्चेत पारशी धर्माचा प्रभाव अकबरावर पाडण्यात त्यांना यश आले व पारशी धर्म तत्त्वज्ञानात सांगितल्याप्रमाणे अकबराने सूर्य, प्रकाश आणि अग्नी यांची पूजा करावयास सुरुवात केली. आपल्या महालात अखंड अग्नी प्रज्वलन यज्ञ सुरू केला. त्याचबरोबर पारशी धर्मगुरू दस्तुर मेहरजी राणा यास २०० बिघे जमीन दान देऊन सम्राट अकबराने त्यांचा सन्मान केला.

**६. अकबर व इस्लाम धर्म :** अकबर हा इस्लाम धर्मातील सुन्नी पंथाचा होता. परंतु त्याची आई, गुरू, पालक या शिया पंथीयांच्यामुळे अकबराचा कल हा उदारमतवादाकडे वाढू लागला. त्याने इस्लामच्या कायद्यात काही बदल केले. त्यात विवाह व घटस्फोटाबाबतच्या त्याच्या सुधारणा महत्त्वपूर्ण होत्या. मुस्लिमांना चार विवाह करण्याची मान्यता असली तरी एकच विवाह करावा. चुलत, मावस अशा नातेसंबंधात विवाह करू नये. विवाहासाठी मुलाला १६ वर्षे व मुलीस १४ वर्षे ही वयोमर्यादा घालून देण्यात आली. सम्राट अकबराने आपल्या राज्यात समान कायदा व समान न्याय यांचा विचार करून इस्लामी कायद्यात काही बदल घडवून आणले.

अशा प्रकारे सम्राट अकबराने अनेक धर्मातील वरिष्ठांशी चर्चा करून त्यांच्याकडून काही महत्त्वपूर्ण गोष्टी घेतल्या, मात्र कोणत्याही धर्माचे वर्चस्व अकबराने आपणावर लादून घेतले नाही. याबाबत **डॉ. व्ही. ए. स्मिथ** म्हणतात की, ''अकबराने पारशी, जैन, हिंदू व ख्रिश्चन या चारही धर्मातील कोणत्या ना कोणत्या तत्त्वांचा स्वीकार केला; परंतु कोणत्याही एका धर्माचा शिक्का त्याने स्वत:च्या कपाळी मारून घेतला नाही''.

'दीन-ए-इलाही' या धर्माची पार्श्वभूमी विविध धर्मातील वरिष्ठांशी झालेल्या चर्चेतून निर्माण झाली. प्रत्येक धर्मातील आदर्श तत्त्वे घेऊन अकबराने 'दीन-ए-इलाही' नावाचा नवीन धर्म निर्माण केला.



## सम्राट अकबराच्या धार्मिक धोरणाचे महत्त्व

सम्राट अकबराच्या धार्मिक धोरणामुळे सामाजिक ऐक्याचे नवे पर्व सुरू झाले. हिंदू - मुस्लीम यांच्यातील दरी कमी होण्यास मदत झाली. अकबराने आपल्या प्रशासनात धर्म, पंथ, जात यांचा कधीही विचार केला नाही. व्यक्तीच्या पात्रतेनुसार निवडीचे धोरण त्यांनी अंगीकारले. अनेक धर्मातील उदात्त तत्त्वे एकत्र आणून 'दीन-ए-इलाही' या धर्माची स्थापना केली. याबाबत **स्टॅन्ले लेनपूल** म्हणतो की, 'दीन-ए-इलाही' ने हिंदू-मुस्लिमांमध्ये एकतेची भावना निर्माण करून एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेस जन्म दिला.''

## २. सम्राट औरंगजेबाचे धार्मिक धोरण

अकबराने धर्माबाबत एक उदार दृष्टिकोण पुढे आणला. जहांगिरने आपल्या पित्याच्या धोरणाचा अवलंब करत राज्यव्यवस्थेत हिंदूंना सामील करून घेतले. हिंदू धर्मग्रंथांची फारसीत भाषांतरे केली. हिंदू पंडितांना राजाश्रय दिला. त्यांच्याबरोबर दशावताराच्या संकल्पनेविषयी वारंवार चर्चा केली. मात्र पुढील काळात जहांगीरच्या धोरणात बदल होऊन तो कट्टर इस्लाम धर्मीय बनला. जहांगिरविरुद्ध खुस्रोच्या बंडाला शिखांचा पाचवा गुरू अर्जुनसिंग यांचा पाठिंबा आहे या आरोपावरून गुरू अर्जुनसिंगाना फाशी देण्यात आली. पोर्तुगिजांबरोबर झालेल्या संघर्षामध्ये जहांगिरने त्यांची प्रार्थनामंदिरे उद्ध्वस्त करून टाकली. अहमदाबाद येथील जैन मंदिराच्या भव्यतेबाबत त्यास माहिती मिळताच त्यास ते सहन न होऊन जैन लोकांना देशाबाहेर हाकलून द्या आणि त्यांची मंदिरे नष्ट करा असे त्याने आपल्या लष्करास आदेश दिले होते. जहांगिरने अकबराच्या धोरणापासून दूर जात कट्टर इस्लामचा स्वीकार करत मुघल साम्राज्याच्या विघटनाची नांदीच केली असे म्हणावे लागेल.

शहाजहानही आपल्या आजोबांच्या उदारमतवादी धोरणापासून दूर जात इस्लामचा कट्टर पुरस्कर्ता बनला. धर्मांतर केलेल्या हिंदूंना वेतन देण्यास त्याने सुरुवात केली. इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी अनेक प्रलोभने त्याने दाखविली. शहाजहानच्या धार्मिक धोरणाबाबत त्याचा दरबारी इतिहासकार **अब्दुल हमीद लाहोरी** 'पादशहानामा' या ग्रंथात म्हणतो की, ''खावंदांच्या हे नजरेस आणून देण्यात आले की, पूर्वीच्या कारकिर्दीत पुष्कळ देवळांचे बांधकाम, काफरांचा मोठा बालेकिल्ला बनारस येथे सुरू झाले होते पण ते अपुरे राहिले. हे काम पुरे करण्याची आशा काफरांना होती. धर्माचे संरक्षक असलेल्या खावंदानी आज्ञा दिली की, बनारस येथे व आपल्या राज्यात असलेल्या प्रत्येक ठिकाणी ज्या देवळांचे बांधकाम सुरू होते ती पाडून टाकावीत. आता अलाहबाद प्रांतातून अहवाल आला की, बनारस जिल्ह्यातील ७६ देवळांचा नाश करण्यात आला आहे.'' थोडक्यात, शहाजहानने राजधर्म बाजूस सारून धर्मांधतेचा पुरस्कार केला. औरंगजेबाच्या धार्मिक अन्याय अत्याचारास तर सीमाच राहिली नाही. परिणामतः मुघल साम्राज्याचा डोलारा कोसळू लागला.

### सम्राट औरंगजेबाचे धार्मिक संस्था व संघटनांशी संबंध

**१. औरंगजेब व शीख धर्म :** औरंगजेबाच्या कडव्या धार्मिक धोरणामुळे शीख लोक मुघल



Scanned with CamScanner

सत्तेच्या विरोधात उभे राहिले. शिखांचा पाचवा धर्मगुरू अर्जुनसिंग यांनी जहांगिरच्या विरोधात बंड करणाऱ्या खुस्रोला पाठिंबा दिल्यामुळे जहांगिरने इ.स. १६०६ मध्ये त्यांना ठार केले. तेव्हापासून शीख आणि मुघल यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. औरंगजेबाच्या कालखंडामध्ये शिखांचे नववे गुरू तेगबहादूर गादीवर आले. बादशहाच्या शीख धर्मस्थळे नष्ट करण्याच्या मोहिमेमुळे तेगबहादूरनी बंड पुकारले. परंतु मुघल सामर्थ्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. औरंगजेबाने तेगबहादूरला पकडले व इ.स. १६७५ मध्ये त्यांना ठार मारण्यात आले. त्यानंतर तेगबहादूर यांचा पुत्र गोविंदसिंग गुरुपदी आले. ते शिखांचे १० वे शेवटचे गुरू होत. त्यांनी पितृहत्येचा सूड घेण्याचे ठरविले. यासाठी शीख समाज संघटित केला त्यांना क्षात्र धर्माची दीक्षा दिली. खालसा पंथाची स्थापना करून शीख धर्मामध्ये नवचैतन्य निर्माण केले. लष्कर उभारले.



सम्राट औरंगजेब

लोहगड, फत्तेगड, फुलगड, आनंदगड असे किल्ले बांधले. अनेक पहाडी राजांना आपल्याकडे वळविले. औरंगजेबाने गुरू गोविंदसिंगविरुद्ध लाहोरच्या सुभेदारास पाठविले. त्याने आनंदपूरवर स्वारी केली पण शिखांनी त्याचा पराभव केला. त्यानंतर चालून आलेल्या मुअज्जमलाही यश मिळाले नाही. यानंतर औरंगजेबाने रजपूतराजे व मुघल फौज अशा लक्षावधीच्या फौजेसह आनंदपूरवर आक्रमण केले. प्रचंड फौजेपुढे शिखांचा निभाव लागला नाही. गुरू गोविंदसिंगांची दोन मुले यात मारली गेली. २० फेब्रुवारी, १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला. बहादूरशहा व मुअज्जम यांच्यातील यादवी युद्धात गुरू गोविंदसिंगानी बहादूरशहाची पाठराखण केली. याचा मोबदला म्हणून बहादूरशहाने लक्षावधी मोहरा देऊ केल्या व गुरू गोविंदसिंगांना दक्षिणेत येण्याचा आग्रह केला. ते गोदावरी काठी नांदेड मुक्कामी असताना (इ.स. १७०८ मध्ये) दोन पठाणांनी त्यांची हत्या केली. औरंगजेबाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत मुघल–शीख संघर्ष चालू होता.

**२. औरंगजेब व ख्रिश्चन धर्म–इंग्रज :** जहांगिर, शहाजहान यांच्याकडून व्यापारी सवलती मिळविण्यात इंग्रजांनी यश मिळवले होते. मच्छलीपट्टण या ठिकाणी इंग्रजांनी व्यापारी वखार उघडली होती. औरंगजेबाच्या कालखंडात इंग्रजांनी ज्या ज्या ठिकाणी वखारी होत्या त्यांना संरक्षक तटबंदी करून घेतल्या. इंग्रजांचे व्यापारातच बस्तान बसू शकत नसल्याने त्यांनी धर्मप्रसारावर भर दिला नाही. इ.स. १६८५ मध्ये बंगालच्या सुभेदारपदी असणाऱ्या शाहिस्तेखानाने इंग्रजांच्या व्यापारावर स्थानिक कर आकारले. इंग्रजांनी या स्थानिक कराला विरोध केला. औरंगजेबाने इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले व इंग्रजांच्या सुरत, हुगळी, मच्छलीपट्टण



येथील वखारीवर ताबा मिळविला. इंग्रजांचा नाइलाज होऊन त्यांनी नमते धोरण घेऊन बादशहाशी मैत्रीचे धोरण स्वीकारले.

**पोर्तुगीज :** चितगावच्या चाचे लोकांनी मुघल साम्राज्याला धोका निर्माण केला होता. या लुटारू लोकांच्या बंदोबस्तासाठी मिरजुमला याची नियुक्ती केली होती. त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे या कामी इ.स. १६६४ मध्ये शाहिस्तेखानाची नियुक्ती करण्यात आली. त्याने चितगावच्या पोर्तुगीज चाचांचा बीमोड केला. औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे पोर्तुगिजांनी आपल्या धर्मप्रसारास मुरड घातली व मुघलांशी नम्रतेचे धोरण स्वीकारले.

**३. औरंगजेब व हिंदू धर्म :** औरंगजेब सत्तेवर येण्यापूर्वी गुजरात प्रांताचा प्रमुख होता. तेथे त्याने अनेक हिंदु देवालये उद्ध्वस्त केली व धर्मवेड्या धोरणाचा पुरस्कार केला. त्याच्या भविष्यकालीन धार्मिक धोरणाची ती नांदी होती. वारसा युद्धात औरंगजेब विजयी ठरल्यानंतर त्याने स्वतःचा राज्याभिषेक केला. तो कट्टर सुन्नी पंथीय होता. त्याने राजसत्ता व धर्मसत्ता एक केल्या. **डॉ. व्ही.ए.स्मिथ म्हणतात,** "औरंगजेबाला धर्माधिष्ठित राज्य स्थापन करावयाचे होते. एक साम्राज्य, एक सम्राट व एक धर्म हेच त्याचे मुख्य उद्दिष्ट होते."

औरंगजेबाने रजपुतांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारले. जोधपूरचा राजा महाराजा जसवंत सिंग याचा इ.स. १६७८ मध्ये अफगाण मोहिमेवर असताना मृत्यू झाला. तत्पूर्वीच मिर्झा राजा जयसिंगही मृत्यू पावला होता. यामुळे औरंगजेबाने रजपूत राज्य नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. जसवंत सिंगाच्या मृत्यूची बातमी कळताच औरंगजेबाने मारवाड मुघल साम्राज्याला जोडण्याचे आदेश दिले. तो जातीनिशी या मोहिमेवर थांबून त्याने मारवाड ताब्यात घेतला. मारवाड जिंकून तो १२ एप्रिल, १६७९ रोजी दिल्लीस परतला त्याच दिवशी हिंदूवर त्याने जिझिया कर बसविला. जसवंत सिंगाच्या मंत्र्याचा कर्तबगार मुलगा दुर्गादास याने जसवंत सिंगाचा अल्पवयीन राजपुत्र अजितसिंग यास गादीवर बसवून औरंगजेबाशी लढा चालू ठेवला. औरंगजेबाने मेवाडचे राज्य जिंकण्यासाठी मेवाडचा राजा महाराजा राजसिंग याविरुद्ध राजपुत्र अकबराची नियुक्ती केली. परंतु अकबरास यश मिळू शकले नाही. आपल्या वडिलांच्या प्रतिगामी धार्मिक धोरणामुळे राजपुत्र अकबराला उबग आला. त्याने राजसिंगचा मुलगा जयसिंग व दुर्गादास राठोड यांच्याशी मैत्री करून औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारले.

अकबराचे बंड मोडण्यासाठी औरंगजेबाने कुटनीती वापरली. राजपुत्र अकबर, दुर्गादास राठोड व जयसिंग युद्धाच्या तयारीत असतानाच अकबराचा सल्लागार तहाव्वूरखान यास आपल्या बाजूस वळविले आणि 'मेवाडमधील प्रमुख रजपूत सरदारांना येथपर्यंत आणण्यात तू कमालीचे चातुर्य दाखविलेस. कारण तुझ्या माझ्या दोन्ही सैन्यांत या रजपुतांचा सहज फडशा उडेल." अशा प्रकारचा आशय असणारे पत्र अकबरास लिहून ते दुर्गादासच्या हाती पडेल अशी व्यवस्था औरंगजेबाने केली. त्यात तो यशस्वीही झाला. खरा प्रकार दुर्गादासच्या लक्षात येताच त्याने पुन्हा अकबराला विश्वासात घेऊन ते दक्षिणेकडे राजा संभाजीच्या आश्रयास आले. यानंतर औरंगजेब दक्षिणेतील हिंदूंचा (स्वराज्याचा) नाश करण्यासाठी आणि बंडखोर अकबरास शिक्षा

Scanned with CamScanner

करण्यासाठी दक्षिण मोहिमेवर आला. राजपुत्राचे बंड मोडण्यात त्यास यश मिळाले असले तरी मराठ्यांचे राज्य त्यास शेवटपर्यंत जिंकता आले नाही. छ. संभाजी, छ. राजाराम व महाराणी ताराबाई यांनी प्राणपणाने लढा देऊन औरंगजेबास नामोहरम केले. दक्षिणेतील या हिंदू राज्याचा नाश करण्यासाठी त्याने पाव शतक लढा दिला. पण यश मिळाले नाही. मोठ्या निराश स्थितीत २० फेब्रुवारी, १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला.

औरंगजेबाने आयुष्यभर इस्लामेतरांचा द्वेष केला, त्यांना त्रास दिला. इस्लाममधील शिया पंथीयांनाही त्याने माफ केले नाही. आपल्या पाशवी धोरणाचा शेवटी शेवटी त्याला पश्चात्ताप झाला. शहजादा आझम यास लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो की, 'आता मी वृद्ध झालो आहे. माझा जन्म झाला त्या वेळेस मी एकटाच होतो आता जातानासुद्धा मी एकटाच आहे. जाताना मात्र माझ्या शिरावर पापाचे गाठोडे आहे. आयुष्यात परमेश्वराची भक्ती मी काही वेळेला केली नाही याचे मला दुःख वाटते. देशाकरिता किंवा प्रजेकरिता मी काहीच करू शकलो नाही याचे मला दुःख होते. माझे जीवन हे निरर्थक गेले असे म्हणावे लागते.'

औरंगजेबाने सत्तेवर आल्यानंतर हिंदू धर्माच्या विरोधात नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आणि या माध्यमातून आपल्या कट्टर धार्मिकतेचे (धर्मांधतेचे) दर्शन घडविले. त्याने हिंदूंबाबत घेतलेले निर्णय याप्रमाणे –

१. हिंदूंना नवीन मंदिरे, धर्मस्थळे बांधण्याची परवानगी नाकारण्यात आली.

२. हिंदूंची मंदिरे उद्ध्वस्त करण्याचे आदेश दिले. त्याच्या या धोरणामुळे दिल्ली, अयोध्या, बनारस, द्वारका, हरिद्वार, मथुरा, मेवाड, जयपूर, जोधपूर इत्यादी ठिकाणची हिंदू देवालये उद्ध्वस्त झाली. वाराणशीचे विश्वनाथचे मंदिर पाडून तेथे मशीद उभारण्यात आली. अशाच प्रकारे मथुरा येथील डेरा केशवराज येथील मंदिरही पाडण्यात येऊन तेथे मशीद बांधण्यात आली.

३. हिंदू धर्मीयांची अवहेलना करणारा 'जिझिया' कर इ.स. १६७९ मध्ये सुरू करण्यात आला. या कराच्या अन्यायास कंटाळून अनेकांनी इस्लाम धर्म स्वीकारला. या कराचा निषेध म्हणून हिंदूंनी राजवाड्यापासून मशिदीपर्यंतचा रस्ता रोखून धरला. बादशहाने लोकांचे म्हणणे लक्षात न घेता जमावावर हत्ती, घोडे सोडले. यामध्ये कित्येक लोक हत्ती, घोड्यांच्या पायाखाली चिरडले गेले. निकोलस मनुची या जिझिया कराबाबत म्हणतो की, 'हा कर वसुली अधिकारी $^3/_4$ भाग स्वतःकडे ठेवून $^1/_4$ भाग खजिन्यात भरत होते.'

४. हिंदू धर्मीयांच्या अनेक सामाजिक व धार्मिक चालीरीती कायद्याने बंद करण्यात आल्या. यामध्ये सतीप्रथा, नदीकिनारी प्रेत दहन करणे व नदीमध्ये अस्थी विसर्जन, उत्सवप्रसंगी मिरवणुका, शोभायात्रा व दसरा, दिवाळी, होळी यात्रा इत्यादी प्रथांवर कायद्यानुसार निर्बंध घालण्यात आले.

५. साकी मुस्तैदखान म्हणतो की, 'बादशहाने हिंदू विद्या शिकविण्यावर व प्रार्थना म्हणण्यावर बंदी घातली.'

६. इस्लाम धर्माच्या कारागीर व कलाकारांनी हिंदूंच्या मंदिर उभारणीस मदत करू नये अशा प्रकारचा कायदा पास करण्यात आला.



७. इस्लाम व्यापाऱ्यास २ $^1/_2$ तर हिंदू धर्माच्या व्यापाऱ्यास ५ टक्के एवढी जकात द्यावी लागे.

वरील अनेक निर्बंधाबरोबरच हिंदूंना समाजात दुय्यम लेखण्यात आले. अनेक हिंदू धर्मीयांच्या जहागिऱ्या, वतने परत घेण्यात आली. जहागिरी देतानाही भेदभाव केला जाई. न्यायालयीन बाबतीतही हिंदू-मुस्लीम असा भेदभाव केला जात असे. या सर्व बाबींमुळे हिंदू-मुस्लीम यामध्ये दुरावा निर्माण झाला. बादशहाच्याविरुद्ध हिंदू धर्मीयांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. औरंगजेबाच्या हिंदू धोरणाबाबत दरबारी लेखक **साकी मुस्तैदखान** म्हणतो की, "बादशहा औरंगजेबाच्या काळात हिंदूंची जेवढी विटंबना झाली तितकी यापूर्वी कधीच झाली नव्हती". तर डॉ. ए. एल. श्रीवास्तव म्हणतात की, "मोहम्मद अली जीनांना सोडल्यास औरंगजेबासारखी दुसरी अशी एकही व्यक्ती झाली नाही की, जिने या देशातील दोन प्रमुख जातीत भेदभावाची प्रचंड दरी निर्माण केली असेल".

**४. औरंगजेब व इस्लाम धर्म :** औरंगजेब स्वतः सुन्नी पंथीय होता. त्याने उलेमांना महत्त्वपूर्ण स्थान दिले व सुन्नी पंथाला बलिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. इस्लाम धर्मप्रसारावर भर दिला. धर्म स्वीकारणाऱ्या लोकांना सोई-सवलती देऊ केल्या. मानाच्या जागा देऊ केल्या. इस्लामची आचारसंहिता त्याने इस्लाम धर्मीयांवर लादली. इस्लामचे नीतिनियम कठोरपणे त्याने अमलात आणण्याचा प्रयत्न केला. नवीन चालीरीती, वेशभूषा, केशभूषा इत्यादींवरही नियंत्रण ठेवण्यात आले. औरंगजेबाच्या या धार्मिक धोरणामुळे इस्लाम धर्मगुरूंचे अवाजवी महत्त्व वाढले.

**शिया पंथ :** औरंगजेबाच्या कडवट धार्मिक धोरणाचे परिणाम शिया पंथीयांनाही भोगावे लागले. शिया पंथीयांवर ईश्वर निंदेचा आरोप ठेवण्यात आला व त्या पंथाच्या साधूंना शिक्षा ठोठावण्यात आली. **सरमद** हा या धोरणाचा पहिला बळी ठरला. आध्यात्मिकतेच्या वरच्या पातळीवर पोहोचलेला सरमद शरीराची काळजी करत नसे. बादशहाच्या आदेशावरून त्याच्यावर पाखंडीपणाचा आरोप ठेवण्यात आला. त्याची चौकशी करण्यात येऊन राज्याच्या धर्मगुरूंनी त्यास मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. अशा प्रकारे मुस्लीम राज्यात मुस्लीम राजाकडून मुस्लीम साधूचा बळी देण्याची ही पहिली वेळ होती. सरमद प्रमाणेच **महंमद ताहीर** याच्यावरही पाखंडीपणाचा आरोप ठेवून त्यास मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या शिया पंथीय साधूंच्या हत्येबरोबरच या पंथीयावर अनेक निर्बंध लादले. शिया पंथीय साधूंच्या कबरींवर दिवा लावण्यास मनाई करण्यात आली. मोहरम या शिया पंथीयांच्या उत्सवामध्ये हिंदूही समरस होतात म्हणून हा सण साजरा करण्यास बंदी घालण्यात आली.

औरंगजेबाने इस्लाम धर्मीयांवर अनेक बंधने लादून त्यांचे जीवन असह्य केले. नाणी काफरांच्या (हिंदूंच्या) हाती जातात व त्यावरील कलिमाची अवहेलना होते म्हणून बादशहाने नाण्यावरील कलिमा काढून टाकण्याचा निर्णय घेतला. नमस्कार करून अभिवादन करण्याच्या पद्धतीस बंदी घालण्यात आली. पुढे तर कोणतीही प्रतिमा निषिद्ध मानली जाऊ लागली. या

Scanned with CamScanner

धोरणामधूनच आग्रा किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी उभारलेले हत्तीचे पुतळे हलविण्याचा आदेश औरंगजेबाने दिला. दरबारात सोन्या-चांदीचे दागिने वापरण्यास मनाई करण्यात आली. संगीत हे कुराण विरोधी संबोधल्यामुळे त्याच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले.

**औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाचे मूल्यमापन**

सम्राट अकबराने स्वीकारलेल्या उदार धार्मिक धोरणाच्या विरोधी जाऊन औरंगजेबाने कट्टर धार्मिक धोरणाचा अंगीकार केला. यामुळे सुन्नी पंथाचे वर्चस्व वाढीस लागले. धार्मिक मागण्यांनी जोर केला. राजसत्ता धर्मसत्तेच्या वर्चस्वाखाली जाऊ लागली. शिया पंथीयांनाही कट्टर इस्लामी धोरणाचे चटके बसले. हिंदू, शीख व ख्रिश्चन यांना औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाचा प्रचंड त्रास झाला. त्यांनी राजसत्तेविरुद्ध लढे सुरू केले.

अकबराने हिंदू-मुस्लिमांत निर्माण केलेले ऐक्य भंग पावले. औरंगजेबाच्या काळातच बादशहाच्या विरोधात उठाव होऊ लागले. हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगे होऊ लागले. मुसलमान हिंदूंना 'काफर' समजू लागले तर हिंदू - मुस्लिमांना 'म्लेंच्छ' असे संबोधू लागले. औरंगजेबाच्या कठोर धार्मिक धोरणाबाबत डॉ. एस. आर. शर्मा म्हणतात की, 'औरंगजेबाच्या कडव्या धर्मांतराचे धोरण हे शहाजहानप्रमाणे देवळे नष्ट करण्याची क्षणिक लहर नव्हती तर जाणीवपूर्वक व पद्धतशीरपणे ठरवून ते अमलात आणले होते'. थोडक्यात, औरंगजेबाच्या कठोर धार्मिक धोरणामुळे मुघल सत्ता खिळखिळी झाली व तिच्या ऱ्हासास प्रारंभ झाला.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. मुघलांच्या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेतील मीरबक्षी म्हणजे .... होय.
(अ) अर्थमंत्री (ब) न्यायमंत्री (क) युद्धमंत्री (ड) प्रधानमंत्री

२. मुघल प्रशासनात धर्मादाय विभागाच्या प्रमुखाला .... म्हटले जाई.
(अ) दिवाण (ब) मीर बक्षी (क) खान-ए-सामा (ड) सद्-इ-सदर

३. मुघल प्रशासनातील गुप्तहेर प्रमुखाला .... असे संबोधले जाई.
(अ) दरोगा-ए-डाकचौकी (ब) मीर आतीव
(क) शिकेदार (ड) अमीन

४. मुघल काळात प्रांत प्रमुखास .... असे संबोधले जाई.
(अ) अंमलगुजार (ब) सिपाहसालार (क) बितीकची (ड) शिकेदार

५. मुघल कालखंडात मुकादम हा .... चा प्रमुख होय.
(अ) खेडे (ब) परगणा (क) सरकार (ड) प्रांत



६. मुघल शासनास The Paper Government असे .... नी संबोधले.
(अ) त्र्यं. शं. शेजवलकर (ब) सेतुमाधवराव पगडी
(क) जदुनाथ सरकार (ड) गो.स. सरदेसाई

७. धार्मिक चर्चा होण्यासाठी फत्तेपूरसिक्री येथे इबादतखाना (प्रार्थना स्थळ) ची निर्मिती .... नी केली.
(अ) हुमायून (ब) अकबर (क) जहांगिर (ड) शहाजहान

८. अनेक धर्मातील उदात्त तत्त्वे एकत्र करून .... ने 'दीन-ए-इलाही' या प्राचीन धर्माची स्थापना केली.
(अ) अकबर (ब) जहांगिर (क) शहाजहान (ड) दारा

**लघूत्तरी प्रश्न / टीपा लिहा**

१. मुघल प्रशासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगा.
२. मुघलांचे प्रांतिक प्रशासन स्पष्ट करा.
३. मुघलांचे जिल्हा प्रशासन स्पष्ट करा.
४. मुघलांचे तालुका प्रशासन स्पष्ट करा.
५. मुघलांचे ग्राम प्रशासन स्पष्ट करा.
६. अकबराच्या नवरत्न दरबाराची माहिती सांगा.
७. इबादतखाना याबाबत माहिती सांगा.
८. दीन-ए-इलाही या धर्माची माहिती सांगा.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मुघलकालीन प्रशासन व्यवस्थेची माहिती द्या.
२. मुघलकालीन केंद्रीय प्रशासन विशद करा.
३. मुघलांच्या लष्करी प्रशासनाची माहिती सांगा.
४. शेरशहाची प्रशासन व्यवस्था स्पष्ट करा.
५. मनसबदार पद्धतीची सविस्तर माहिती द्या.
६. सम्राट अकबराच्या धार्मिक धोरणाची माहिती सांगा.
७. औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाचा आढावा घ्या.

Scanned with CamScanner